गुरुवार, ५ मे २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २८७
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## भाजपची जयपूरला बैठक; पंतप्रधान मोदी करणार मार्गदर्शन



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने घवघवीत यश मिळविले. यानंतर मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकमध्ये वर्षभरात विधानसभा निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपने जयपूरमध्ये एका बैठकीचे आयोजन केले आहे. २० आणि २१ मे रोजी जयपूरमध्ये होणाऱ्या या बैठकीत पक्षाने देशभरातील पदाधिकाऱ्यांना बोलावले आहे. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून संबोधित करणार आहेत. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. बैठकीत विविध राज्यांमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीची रणनीती, आवश्यक संघटनात्मक बदल आणि तयारी यावर चर्चा होणार आहे.

## अंतरंग

रायगड जिल्ह्यात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत/२
म्हसळ्यातील नदीपात्रात बांधकाम, खारफुटीची कत्तल/५
रायगडात रंगणार महिला क्रिकेट प्रीमियर लीगचा थरार/८

# मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग

## ■ जनहित याचिका दाखल करणार –किरीट सोमय्या

**पनवेल : हरेश साठे**

कोर्लई येथील १९ बंगल्यांचा मालमत्ता घोटाळा लपविण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग झाला आहे, असा गंभीर आरोप करीत या प्रकरणी जनहित याचिका दाखल करणार असल्याची माहिती भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमेय्या यांनी बुधवारी (दि. ४) येथे दिली. हनुमान चालिसा, त्याविषयी असलेली भावना व त्यातून झालेले प्रतिकात्मक आंदोलन राजद्रोह कसा होऊ शकतो, असा सवालही त्यांनी या वेळी ठाकरे सरकारला केला.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयास सोमय्या यांनी बुधवारी सायंकाळी सदिच्छा भेट दिली. त्या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शहर सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष के. सी. पाटील, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील उपस्थित होते.

या वेळी किरीट सोमय्या यांनी ठाकरे सरकार, संजय राऊत, आदित्य ठाकरे यांच्यावर तोफ डागली तसेच सचिन वाझे, प्रदीप शर्मा यांचे कनेक्शन फक्त ठाकरे सरकारच्या घोटाळ्यांसाठी झाले असल्याचे अधोरेखित करतानाच मुंबईचे पोलीस आयुक्त संजय पांडे यांची संशयास्पद भूमिका प्रकर्षाने मांडली.

हनुमान चालिसाचे 'मातोश्री'बाहेर पठण करण्याचा प्रामाणिक उद्देश घेऊन राणा दाम्पत्य मुंबईत आले, मात्र ठाकरे सरकारला त्याची चीड आली आणि त्यांच्यामागे कार्यकर्ते व पोलिसांचा ससेमिरा लावण्यात आला. एवढेच नव्हे; तर त्याहीपलीकडे जाऊन त्यांच्यावर उद्धव ठाकरेंच्या माफिया सरकारने राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला. धार्मिक आणि सामाजिक भावना लक्षात घेता हा राजद्रोहाचा गुन्हा दाखल करणे अत्यंत निषेधार्ह आहे. उद्या पोलीस कोठडीतून नवनीत राणा आणि रवी राणा यांची सुटका झाल्यानंतर मी त्यांची मुंबईत भेट घेणार आहे, असे आवर्जून नमूद करतानाच हिंमत असेल तर त्या ठिकाणी माझ्यावर हल्ला करायला गुंड पाठवावेत, असे आव्हानही सोमय्या यांनी केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुपारी देऊन तीन वेळा माझी हत्या करण्याचा प्रयत्न केला होता आणि प्रत्येक वेळी मी वाचतो हे उद्धव ठाकरे यांचे दुर्दैव आहे, असा घणाघाती हल्ला सोमय्या यांनी केला. देव आणि महाराष्ट्रातील जनतेच्या आशीर्वादाने मी वाचलो आहे, असेही त्यांनी नमूद केले.

पक्षाचे प्रमुख सांगतात त्याप्रमाणे प्रवक्ता बोलत असतो. तशाच प्रकारे संजय राऊत वायफळपणे बोलत असतात, असे सांगतानाच संजय राऊत यांनी माझ्यावर १२ आरोप केले, पण एकही आरोपाची कागदपत्रे सादर करू शकले नाहीत. त्यामुळे संजय राऊत डरपोक आहेत हे सिद्ध झाले आहे. २०१९च्या निवडणुकीत प्रदीप शर्मा शिवसेनेचे अधिकृत उमेदवार होते आणि सचिन वाझे प्रवक्ता होते. त्यानंतर ठाकरे सरकार सत्तेत आल्यावर सचिन वाझेची पुनर्नियुक्ती ठाकरे सरकारने केली. सचिन वाझे १०० कोटी वसुली ही ठाकरे सरकारची योजना आहे आणि मनसुख हिरेन यांची हत्या ठाकरे सरकारमुळे झाली आहे, असा सनसनाटी आरोपही त्यांनी या वेळी केला. **(पान २ वर..)**

## कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणात सर्व दोषींवर कारवाई व्हावी –आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळा सर्वश्रुत आहे. विवेक पाटील यांनी बोगस कर्जदार उभे करून सर्वसामान्यांची लूट केली. माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या संदर्भात आवाज उठविण्यासाठी आम्हाला मार्गदर्शन आणि नेतृत्व दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आरबीआय, सहकार क्षेत्र, सरकारकडे पाठपुरावा केला. मोर्चे काढले, पनवेल पोलीस ठाणे, सीआयडीकडे गुन्हे दाखल केले, मात्र राज्य सरकारने कोणतीही सकारात्मक कारवाई केली नाही. म्हणून आम्ही हा तपास आणि त्या अनुषंगाने तक्रार ईडीकडे केली. त्यामुळे ही कारवाई झाली. या प्रकरणात विवेक पाटील यांच्यासोबत संबंधित दोषींवरही कारवाई व्हावी ही आमची मागणी असून कर्नाळा बँक घोटाळा उघड करण्यास आणि ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न करणारे माजी खासदार किरीट सोमय्या यांचा पनवेलमध्ये विशेष सत्कार करणार आहोत, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

# दोन आठवड्यांमध्ये निवडणुका जाहीर करा

## सर्वोच्च न्यायालयाचे आदेश; मविआ सरकारला धक्का

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



सर्वोच्च न्यायालयाने महाविकास आघाडी सरकारला ओबीसी आरक्षणावरून मोठा धक्का दिला आहे. राज्य सरकारने या संदर्भात केलेला कायदा फेटाळून लावत १५ दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाकडून बुधवारी (दि. ४) राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आला. त्यामुळे आता ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत.

राज्यात जवळपास १८ महापालिका आणि २५ जिल्हा परिषदांसह अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. या निवडणुका २०२०च्या जुन्याच प्रभागरचनेनुसार घेतल्या जाव्यात, असे आदेश न्यायालयाने बुधवारी दिले. एवढेच नाही, तर निवडणुका सतत पुढे ढकलण्यात आल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाच्या कारभारावर या वेळी तीव्र नाराजी व्यक्त केली.

## हे राज्य सरकारचे अपयश –देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर माजी मुख्यमंत्री आणि विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हे शंभर टक्के राज्य सरकारचे अपयश आहे, असे म्हणत महाविकास आघाडीवर टीका केली आहे. माध्यमांनी प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने नेमके काय म्हटले आहे हे अद्याप मला समजलेले नाही, पण जे प्राथमिकरित्या समजले ते असे आहे की, पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि सहा महिनांपेक्षा जास्त काळ प्रशासक ठेवता येत नाही. संविधानाने तशी तरतूद ठेवलेली आहे. म्हणून अशा सगळ्या ठिकाणी तत्काळ निवडणुका लावण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. हे शंभर टक्के राज्य सरकारचे अपयश आहे. दोन वर्षे या सरकारने टाईमपास केला आणि ट्रिपल टेस्ट पूर्ण केली नाही. त्यामुळेच अशा प्रकारचा निर्णय आला आहे. या निर्णयामुळे ओबीसींची अपरिमित हानी होणार आहे आणि या हानीला सरकारच जबाबदार आहे. योग्य प्रकारे या सरकारने कधीच भूमिका मांडलेली नाही. तथापि, आम्ही या संदर्भात आम्ही संपूर्ण निर्णय समजून घेऊ आणि त्यानंतर आमची पुढची भूमिका मांडू.

**ओबीसींच्या आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या आदेशामुळे स्पष्ट झाले आहे. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारने ओबीसींची फसवणूक केली असून पाठीत खंजीर खुपसला आहे. तथापि, आगामी निवडणुकीत भारतीय जनता पक्ष मात्र २७ टक्के तिकिटे ओबीसींना देऊन या समाजाला न्याय देईल.**

**–चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष**

## निवडक


### उत्तर प्रदेशात एक लाख भोंगे उतरवले –योगी

**लखनऊ :** महाराष्ट्रात भोंग्यांवरून गदारोळ सुरू असताना दुसरीकडे उत्तर प्रदेशात मात्र शांततेत भोंगे उतरवण्यात येत आहेत. याबाबत बोलताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले की, आमच्या सरकारने भोंग्याचे प्रकरण चांगल्या प्रकारे हाताळले आहे. विविध धार्मिक स्थळांवरून आतापर्यंत सुमारे एक लाख भोंगे हटवण्यात आले आहेत.

### नागपूरमध्ये ५० लाखांची लाच घेताना तीन अधिकारी जेरबंद

**नागपूर :** चंद्रपूरमधील उपविभागीय जलसंधारण अधिकारी तथा प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी श्रावण शेंडे यांना मंगळवारी (दि. ३) रात्री ५० लाखांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. नागपूरचे जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा प्रभारी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी कविजीत पाटील (४६) व मृद व जलसंधारण कार्यालय चंद्रपूरचे विभागीय लेखाधिकारी रोत गौतम यांनाही अटक झाली आहे.

# अखेर राणा दाम्पत्याला जामीन मंजूर



**मुंबई : प्रतिनिधी**


राजद्रोहाच्या गुन्ह्याखाली अटकेत असलेल्या अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना मुंबई सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने राणा दाम्पत्याची अटक बेकायदेशीर ठरवली आहे.

आमदार रवी राणा तळोजा तुरुंगात, तर खासदार नवनीत राणा या भायखळा येथील महिला तुरुंगात आहेत. जामीन मंजूर झाल्याने त्यांची सुटका होणार आहे. राणा दाम्पत्याला जामीन मंजूर करतेवेळी त्यांच्यावर काही निर्बंध लादण्यात आले आहेत. दरम्यान, अटकेपूर्वी राणा दाम्पत्याला नोटीस देणे गरजेचे होते. अशी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता मुंबई पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यामुळे बचाव पक्षाचा युक्तीवाद न्यायालयाने मान्य करीत राणा दाम्पत्याला जामीन मंजूर केला आहे.

# आ. गणेश नाईकांना हायकोर्टाकडून दिलासा

## अटकपूर्व जामीन मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**



आमदार गणेश नाईक यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे आमदार नाईक यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

लैंगिक अत्याचार आणि धमकी प्रकरणात ठाणे सत्र न्यायालयाने आमदार गणेश नाईक यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. हायकोर्टाने हा सकृतदर्शीनी बलात्कार म्हणता येणार नाही, असे नमूद करीत आमदार नाईक यांना दिलासा दिला. त्याचप्रमाणे अटक झाल्यास वैयक्तिक बंधपत्रावर सुटकेचे आदेशही दिले आहेत.



## सदिच्छा भेट

**अलिबाग : केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी बुधवारी ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिन धर्माधिकारी यांची त्यांच्या रेवदंडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, तालुका अध्यक्ष परशुराम पाटील, माजी अध्यक्ष हेमंत दांडेकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : महेंद्र खैरे)





## अभिनंदन!

**उलवे नोड : श्रीलंकेत झालेल्या एशियन टेनिस फेडरेशनच्या १४ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाकडून खेळलेला रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा ओम वर्मा याने चमकदार कामगिरी केली, तर जी. पी. पारसिक सहकारी बँक आणि व्हीपीएम्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने ठाणे येथे आयोजित स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल कॉम्प्लेक्सचा क्षितीज शिंदे व विक्रम विमुला यांनी सुयश संपादन केले. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या खेळाडूंचे मंगळवारी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे जनरल सेक्रेटरी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख उपस्थित होते.**



## भूसुरूंग स्फोटात ढेकू गावातील चार घरांचे नुकसान

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात नव्या चारपदरी मिक्सिंग लिंकचे काम सुरू असून डोंगर पोखरताना मोठ्या प्रमाणात भूसुरूंग स्फोट घडवून आणले जात आहेत. अशाच प्रकारे बुधवारी (दि. ४) दुपारी भूसुरूंग केले असता स्फोटातील महाकाय दगडगोटे एक्स्प्रेस वेशेजारी असलेल्या ढेकू गावात पडून यामध्ये चार घरांचे नुकसान झाले.

सुदैवाने घरात कोणीही नसल्याने अनर्थ टळला, पण या घटनेची माहिती मिळताच काही ग्रामस्थांनी जमा होत एक्स्प्रेस वे रोखण्याचा प्रयत्न केला. या वेळी त्यांनी अफकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत जाब विचारला आणि नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी केली.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

# ...तोपर्यंत मनसेचे आंदोलन सुरूच राहणार -राज ठाकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

सगळीकडचे भोंगे उतरले पाहिजे ही आमची मागणी आहे. आमचे आंदोलन एक दिवसापुरते नाही. जोपर्यंत भोंगे उतरणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहिल, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटले आहे. ते बुधवारी (दि. ४) पत्रकार परिषदेत बोलत होते.

राज ठाकरे यांनी भोंग्यांविरोधात भूमिका घेत याबाबत राज्य सरकारला ४ मेपर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. त्यानुसार बुधवारी राज्यभरात अनेक ठिकाणी मनसैनिकांकडून मशिदींसमोर हनुमान चालिसा लावत आंदोलन करण्यात आले. दरम्यान, काही ठिकाणी मशिदींनी भोंग्याचा वापर करणे टाळले, तर काही ठिकाणी मनसे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये वाद झाल्याचे दिसून आले.



या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. आज अजान दिली नाही म्हणून आम्ही खूश होणार नाही. दिवसभरात ज्या ज्या वेळी अजान लागेल त्या वेळी हनुमान चालिसा लागेल. हा सामाजिक विषय आहे. याला धार्मिक वळण जर दिले, तर आम्हीही देऊ. शांतता बिघडावी अशी आमची अजिबात इच्छा नाही, असे ते म्हणाले.

## संदीप देशपांडेंचा पोलिसांना चकवा


*मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानंतर मनसैनिकांकडून भोंग्यांच्या विरोधात आंदोलन करण्याचा प्रयत्न होत आहे, तर दुसरीकडे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांकडून मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची धरपकड सुरू आहे. याचदरम्यान राज यांच्या निवासस्थानाबाहेर मनसे नेते संदीप देशपांडे आणि संतोष धुरी यांनी पोलिसांना चकवा देत ते गाडीतून बसून निघून गेले. या झटापटीत एक महिला पोलीस जखमी झाल्याचे वृत्त आहे.*

# ओबीसींच्या पाठीत खंजीर खुपसला

## ▌प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा आघाडी सरकारवर हल्लाबोल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ओबीसींच्या आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्पष्ट झाले आहे. शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारने ओबीसींची फसवणूक केली असून पाठीत खंजीर खुपसला आहे. तथापि, आगामी निवडणुकीत भारतीय जनता पक्ष मात्र २७ टक्के तिकिटे ओबीसींना देऊन या समाजाला न्याय देईल, अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापूर येथे दिली.



### भाजपकडून २७ टक्के आरक्षण देण्याची ग्वाही

चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होईल. भाजप निवडणुकीसाठी सदैव सज्ज असतो. आम्ही निवडणूक लढवू आणि त्यामध्ये भाजपची उमेदवारी देताना प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत एकूण जागांपैकी २७ टक्के जागांवर ओबीसींना तिकिटे देऊन भाजपतर्फे या समाजाला न्याय देऊ. काही काळापूर्वी सहा जिल्हा परिषदांच्या ओबीसी आरक्षित जागा रद्द होऊन पोटनिवडणुका झाल्या असता भाजपने त्या खुल्या झालेल्या ओबीसींच्या जागेवर ओबीसींनाच तिकिटे देऊन निवडून आणले होते. सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०२१ रोजी ओबीसी राजकीय आरक्षण रद्द केले. न्यायालयाने सांगितलेली ट्रिपल टेस्ट पूर्ण करून हे आरक्षण पुन्हा लागू करणे शक्य आहे. महाविकास आघाडी सरकारने त्यानुसार एंपिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली असती तर ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा अस्तित्वात आले असते, पण हे सरकार केवळ चाल-ढकल करत राहिले व परिणामी ओबीसी समाजाचे कायमचे नुकसान झाले आहे. महाविकास आघाडी सरकारने ओबीसींची फसवणूक केली आहे.

**“ मी पूर्वीच असे भाष्य केले होते, ओबीसी आरक्षणाला धक्का नसून धोका आहे आणि ते आता सत्यात उतरताना दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकार गंभीरपणे ओबीसी आरक्षणाची बाजू मांडण्यात अपयशी ठरले, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणासमोरचे प्रश्नचिन्ह हे अजून गूढ होत आहे तसेच सर्वोच्च न्यायालयने सांगितले आहे की, निवडणुका जाहीर करा पण तरीही राज्य सरकार आता काय भूमिका घेणार आहे? राज्य सरकार मंत्रीमंडळात एक विशेष निर्णय घेऊन, ओबीसी आरक्षणाबरोबरच निवडणुका घेऊ अशी भूमिका घेणार आहे का? याकडे आता माझे लक्ष आहे.**



**-पंकजा मुंडे, भाजप नेत्या तथा माजी मंत्री**

# रोह्यात पहाटेची बांग झालीच नाही

## ▌मनसेकडून मारुती मंदिरात आरती व हनुमान चालिसा



**“ आमचे नेते राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशावरुन कायदा सुव्यवस्था राखत कोणत्याही समाजाची भावना न दुखवता आम्हा कार्यकर्त्यांकडून रोह्यातील मारुती मंदिरात बुधवारी दुपारी हनुमान चालिसाचे पठण करण्यात आले.**

**-अमोल पेणकर, जिल्हा सचिव, मनसे**

**रोहे : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अनधिकृत भोंग्यावरून अल्टिमेटम दिल्यानंतर बुधवारी (दि. ४) सकाळी रोह्यातील कोणत्याच मशिदीमध्ये भोंग्यावरून बांग झाली नाही. मुस्लीम समाज बांधवांनी भोंग्याविनाच नमाज अदा केली. दरम्यान, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी मनसे पदाधिकाऱ्यांना आधीच नोटीसा दिल्या होत्या तसेच मंगळवारी (दि. ३) मुस्लीम समाजबांधवांची बैठक घेतली होती. खबरदारी म्हणून रोहा पोलीस ठाण्याचे १२ कर्मचारी, विशेष पोलीस पथक व होमगार्ड तैनात करण्यात आले होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी यांनी शहरास भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. रोह्यातील सहा मशिदींवर बुधवारी पहाटेच्या नमाजाच्या वेळी बांग दिली नसल्याचे अल्ताफ चोरडेकर यांनी सांगितले. शासनाकडून रितसर परवानगी घेत मनसेच्या वतीने बुधवारी दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास रोह्यातील हनुमान मंदिरात आरती व हनुमान चालिसा घेण्यात आल्या. मनसेचे जिल्हा सचिव अमोल पेणकर, तालुकाध्यक्ष अक्षय रटाटे, शहराध्यक्ष मंगेश रावकर, उपशहराध्यक्ष अमित पवार, महेश वाडकर, सुरज मुटके, कुंजन भोकाटे आदींसह मनसे कार्यकर्ते मंदिरात उपस्थित होते.

# रश्मी ठाकरेंच्या कोर्लईतील मालमत्तेप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार

## ▌भाजप नेते किरीट सोमय्या यांची अलिबागमध्ये माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे तसेच रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर यांच्या कोर्लई येथील १९ बंगल्यांच्या मालमत्तेप्रकरणी आपण उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत, अशी माहिती भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी बुधवारी (दि. ४) येथे दिली.

मुरूड तालुक्यातील कोर्लई गावात रश्मी ठाकरे आणि मनीषा वायकर याच्या नावे नऊ एकर जमिनीवरील १९ बंगल्याचे प्रकरण भाजप नेते किरीट सोमय्या यांनी उचलून धरले आहे. याबाबत त्यांनी कोर्लई ग्रामपंचायतीकडून माहिती घेतली आणि रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच राजिप मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यातही तक्रार दिली तरी प्रशासनाने कोणतीच कारवाई केली नाही. त्यामुळे सोमय्या यांनी या प्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. या याचिकेबाबत बुधवारी सोमय्या यांनी अलिबाग शहराध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा यांच्या निवासस्थानी १० वकिलांसह चर्चा केली.



याबाबत किरीट सोमय्या यांनी कागदपत्रे दिली आहेत. आठ दिवसांत मसुद्याला अंतिम रूप देण्यात येईल. त्यानंतर याचिका न्यायालयात दाखल केली जाणार आहे, असे सोमय्या यांचे वकील किरण कोसमकर यांनी सांगितले. अंकित बंगेरा, किरण कोसमकर, अमित देशमुख, सुहास कारूळकर, श्रीराम ठोसर, अभिषेक सावंत, श्रीविष्णू शशीधरन, निखिल चव्हाण, लिद साळावकर, वैशाली बंगेरा या वेळी उपस्थित होते.

# महाडमधील मनसे कार्यकर्त्यांची पोलिसांकडून धरपकड

**महाड : प्रतिनिधी**

जर ३ मेपर्यंत अनधिकृत भोंगे हटले नाहीत तर ४ तारखेला जिथे भोंग्यावर अजान होईल त्या मशिदीसमोर मोठ्या आवाजात हनुमान चालिसा लावा, असे आवाहन राज ठाकरे यांनी मनसैनिकांना केले होते. त्यामुळे पोलिसांनी बुधवारी (दि. ४) धरपकड करीत महाडमधील मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

मशिदीवरील अनधिकृत भोंगे व त्यामुळे होत असलेल्या त्रासाबद्दल कारवाई करावी अशी मागणी करीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारला ३ मेपर्यंत अल्टिमेटम दिला होता. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनातर्फे मनसेच्या पदाधिकाऱ्यांना आधीच नोटिसा पाठवण्यात आल्या होत्या. सुरक्षेच्या कारणासाठी बुधवार सकाळी महाडमधील मनसे कार्यालयातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष चेतन उतेकर यांच्या कार्यालयात बुधवारी सकाळी पोलिसांचा फौजफाटा जमा झाला होता मात्र उतेकर पोलिसांच्या हातावर तुरी देण्यात यशस्वी झाले. कार्यालयातील काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या वेळी मनसेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणा देत पोलिसांच्या कारवाईचा निषेध केला.

(छाया : महेश शिंदे)



# रायगडात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. ७) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याचे न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण संदीप वि. स्वामी यांनी सांगितले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे ॲक्टखालील प्रकरणे दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था इतर थकबाकी बाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यव होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेले शुल्क परत मिळते. त्यामुळे शनिवारी (दि. ७) होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा व शासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभा इंगळे यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त प्रबोधन संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आकुर्ली परिसरात म्हसकर डेअरी येथे छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त विशेष प्रबोधन संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती क्रांतीसेनेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय पिछडा (ओबीसी) वर्ग मोर्चा राष्ट्रीय प्रचारक डॉ. अनिलकुमार माने यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्घाटन पंढरीनाथ फडके यांच्या हस्ते होणार आहे. गुरुवारी (दि. १२) सायं. ५ वा. कार्यक्रम होणार आहे.

पान १ वरून

## मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग

रश्मी उद्धव ठाकरे यांनी अन्वय नाईकांकडून कोर्लई येथे ९.५ एकर जमीन १९ बंगल्यांसह विकत घेतली. अन्वय नाईक आणि ठाकरे कुटुंबीय या ५.४२ कोटलेल्या १९ बंगल्याची १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०२१पर्यंत कर भरत होते, पण इन्कम टॅक्स रिटर्न्समध्ये हे बंगले दाखवले गेले नाहीत, असे सांगून या विषयावर मंगळवारी अलिबाग येथे १२ वकिलांशी जवळपास एक तास चर्चा केली असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले. या संदर्भात पुढील १० दिवसांत याचिकेचे काम पूर्ण होऊन मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे नमूद करून सोमय्या यांनी आणखी एक बॉम्ब टाकला आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**दुसरी मागणी (Second Call)**

निविदा सूचना क्र. पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२-२३ दिनांक :- ०२/०५/२०२२

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय (State Government, Central Government, Government undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बाबन्याय दर पद्धतीनुसार (बी-२) जाहीर ई-निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/PMAY/ 2022-23 | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Services For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | Rs. 1,58,00,000/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ०५/०५/२०२२** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. निविदा ०५/०५/२०२२ ते १९/०५/२०२२ ह्या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. निविदा सादर करण्याची शेवटची दिनांक १९/०५/२०२२ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सूचना**
**दुसरी मागणी (Second Call)**

निविदा सूचना क्र. पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२-२३ दिनांक :- ०२/०५/२०२२

Commissioner, Panvel Municipal Corporation is inviting Item rate E-Tenders (B-2) for below mentioned work from eligible and experienced contractors of State Government, Central Government, Government undertaking.

| Sr. No. | Tender No. | Name of the Work | Cost of Tender (without GST) |
|---|---|---|---|
| 1 | PMC/CE/PMAY/ 2022-23 | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Services For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | Rs. 1,58,00,000/- |

Interested tenders should note that detailed information and tender documents are available on Maharashtra Govt. website "http://mahatenders.gov.in" from **05/05/2022 to 19/05/2022.** Last date of submission of tender by way of E-tendering will be 19/05/2022 up to 17 Hrs.

Sd/-
(Trupti Sandbhor)
Add. Commissioner
Panvel Municipal Corporation






**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. ५ मे २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल ▪ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ▪ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामीण लसीकरण**

▪ तळोजा पाचनंद ▪ रोहिंजण/किरवली ▪ टेंभोडा ▪ नावडा ▪ ओवा कॅम्प/ओवा ▪ रोडपाली बौद्धवाडी/कातकरीवाडी

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरिकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरिकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरिकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नवीन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरिकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोसचे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोसकरीता दिलेला मोबाईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे.
- नागरिकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन ॲपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे. त्याप्रमाणे कोविनवर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.

# खारघरमध्ये पाणीपुरवठ्याची बोंबाबोंब!

## भाजप उद्या करणार सिडकोचा जाहीर निषेध

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सिडकोने वसविलेल्या खारघरमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. येथील नागरिकांना अनियोजित पाणीपुरवठ्याचा त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी सिडको कार्यालयात करण्यात आल्या आहेत. या संदर्भात भाजप खारघर-तळोजा मंडलच्या वतीने वेळोवेळी सिडकोकडे पाठपुरावा केला, मात्र याकडे सिडको दुर्लक्ष करीत असल्याने आता भाजप पदाधिकारी शुक्रवारी (दि. ६) सिडकोचा जाहीर निषेध करणार आहेत.

सिडकोने वेळोवेळी पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत तारीख देऊन खारघरचे सर्व नागरिक तसेच लोकप्रतिनिधींची दिशाभूल केली असून शुक्रवारी सकाळी १० वाजता सिडकोच्या माध्यमातून खारघर सेक्टर १४ येथे सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम व खारघर रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम आपण पूर्णपणे बंद पाडुया यासाठी एकत्र यावे, असे आवाहन भाजप खारघर-तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केले आहे.

दर आठवड्याला सोमवारी पाणी साठवण्यासाठी शटडाऊन घेतला जातो तरी खारघरमध्ये पाणीबाणी का? किती दिवस आपण हे सहन करणार आहोत? प्यायला पाणी नाही पण सिडको नवीन प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र देत सुटली आहे. फक्त पन्नास टक्के पाणीपुरवठा होतो, मग जनतेने का गप्प बसायचे? हे नवीन प्रकल्प चालू करायचे अशा अकार्यक्षम सरकारच्याविरोधात भाजप खारघर-तळोजा मंडळ काम बंद आंदोलन करीत आहे. आपण मोठ्या संख्येने यात सामील व्हावे आणि खोट्या सिडकोला जाब विचारावा. खारघरमधील पाण्यासाठी त्रस्त झालेल्या तमाम जनतेला विनंती असून हीच ती वेळ आहे, सिडकोला ताकदीचा टोला देण्याची. तरी सर्व नागरिकांनी येणाऱ्या शुक्रवारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सिडको व महाराष्ट्र शासनाला जनतेची ताकद दाखवू, असे आवाहन भाजपच्या वतीने करण्यात आले आहे.



# सुकापूरमध्ये कायदेशीर सल्ला कार्यालय

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सुकापूर येथे अ‍ॅड. निलम भोसले आणि प्रा. प्रफुल भोसले यांनी 'बाबासाहेब्स लीगल असोसिएटस्ट' हे कायदेशीर सल्ला देणारे कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ३) उद्घाटन झाले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भोसले दाम्पत्यांनी सुरू केलेल्या या नवीन कार्यालयाच्या पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

उद्घाटनावेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सुकापूरच्या सरपंच योगिता भगत, उपसरपंच दिवेश भगत, ग्रामपंचायत सदस्या प्राची जाधव, महेश पाटील, प्रमोद भगत, पुष्पा म्हस्कर, अनिता पाटील, अशोक पाटील, आत्माराम पाटील, उदय म्हस्कर, उदय पोपेटा, रूपेश पाटील, मोहन दळवी, अनिकेत पाटील, राजेश पाटील, नरेंद्र गायकवाड यांच्यासह भोसले कुटूंबातील सदस्य उपस्थित होते.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, प्रगती करायची असेल तर सर्व अडचणींवर मात करावी लागते त्यावेळी वकील मंडळींचा मोठा फायदा होतो. त्यामुळे 'बाबासाहेब्स लीगल असोसिएटस्ट'च्या माध्यमातून अनेकांना कायदेशीर सल्ला मिळेल अशी आशा व्यक्त करून पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : भाजप शहर उपाध्यक्ष सतिश पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी महेंद्र कावळे, गुरूनाथ दुंद्रेकर, परेश पाटील, अनिकेत भोईर, विनय पाटील, रुतिक कावळे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्यामार्फत पळस्पे येथे नवीन इमारत प्रकल्प उभारण्यात येत आहे. या इमारत बांधकामाचे भूमिपूजन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, रतनशेठ भगत, अ‍ॅड. संतोष पाटील, संदीप पटेल, प्रसाद देशमुख, मनोहर म्हात्रे आदी उपस्थित होते.**





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यालयीन व्यवस्थापक अनिल कोळी यांच्या गव्हाण येथील नवीन घराची वास्तुशांती पूजा अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर आयोजित करण्यात आली होती. या पुजेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट घेऊन दर्शन घेतले व अनिल कोळी यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जयवंत देशमुख आदी उपस्थित होते.**

# आज पनवेल मनपा सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्प सादर होणार

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. ५) होणार असून या सभेत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी सकाळी ११.३० वाजता सर्वसाधारण सभा होणार आहे. या सभेत स्थायी समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. नरेश ठाकूर स्थायी सभेने मंजूर केलेला सन २०२२-२०२३ अर्थसंकल्प महापौर डॉ. कविता चौतमोल यांना मंजुरीसाठी सादर करतील.

# सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा

**पनवेल : वार्ताहर**

आयकर विभागातील सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मोटे यांनी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला. वाढदिवसानिमित्त डॉ. सचिन मोटे यांनी गोरगरीब रुग्णांची आरोग्य तपासणी, अनाथ आश्रममध्ये फळ वाटप आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात केले.



कळंबोली येथील स्वामी समर्थ मंदिरात वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी विविध तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून शेकडो रुग्णांची वेगवेगळ्या आजारावर वैद्यकीय चिकित्सा करण्यात आली, तसेच मोफत औषधोपचार करून योग्य सल्ला देण्यात आला.तसेच यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना डॉ. सचिन मोटे यांनी शालेय साहित्याचे वाटप केले.



**पनवेल : जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांनी रमजान ईदनिमित्त आपटा व बारापाडा येथे मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी मुस्लिम बांधवांसह तेथे आपले कर्तव्य बजावत असलेले पोलीस अधिकारी व बांधवांना शुभेच्छा देत प्रेम आणि सद्भावना व्यक्त केल्या.**



**तळोजा : महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी पत्रकार वसीम पटेल यांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.**



**उलवे नोड : अक्षय्य तृतीयेनिमित्त सेक्टर २१ येथे जितेंद्र जैन यांनी निसर्गधन शुद्ध तेल भांडार सुरू केले आहे. या दुकानाचे उद्घाटन भाजपच्या उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्षा निकिता खारकर यांच्या हस्ते झाले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीच्या सदस्य गीताताई ठाकूर, भाजपचे गव्हाण विभागीय सरचिटणीस निलेश खारकर, संतोष पाटील, नंदकुमार ठाकूर, प्रणय कोळी, दुकानाचे मालक जितेंद्र जैन, आकाश ब्राह्मणे, अश्विनी बनसोडे, निलेश कोळी, कुणाल भोसले आदी उपस्थित होते.**

# पनवेलमार्गे लांब पल्ल्याच्या रेल्वे लवकरच होणार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोविड-१९ मुळे ओढवलेल्या लॉकडाऊनमुळे मध्य रेल्वे प्रशासनाकडून पनवेल मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल्वे बंद करण्यात आल्या होत्या. त्या १० मे पासून सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पनवेल प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पनवेल मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल्वे पुन्हा सुरू करण्यासाठी नुकतीच प्रवासी संघ, पनवेलचे पदाधिकारी व अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत बापट यांनी रेल्वेच्या उच्च, ज्येष्ठ अधिकाऱ्यांशी

### प्रवासी संघाची माहिती

व महसुल शासनांच्या रेल्वे संबंधातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. रेल्वे प्रवासी सेवा पुनश्च सुरू करण्यासंबंधीचे काही अधिकार त्या काळात महाराष्ट्र शासनाकडे होते. आता कोविड १९ परिस्थितीमुळे रेल्वे प्रशासनाकडे अधिकार परत आल्याने कोविड स्थिती नियंत्रणात अशीच राहील्यास लांब पल्ल्यांच्या रेल्वे सेवा १० मे पासून व्हाया पनवेलमार्गे सुरू करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न चालू आहेत. असे आमच्या वार्ताहारांना प्रवासी संघ, पनवेलच्या कार्यकारीणीकडून सांगण्यात आले आहे.

**पनवेलमार्गे या रेल्वेगाड्या धावणार**

**अहमदाबाद-चेन्नई (१९४१९-२०), अहमदाबाद-चेन्नई (हमसफर) (२२९१९-२०), पुणे-भुसावळ एक्सप्रेस (११०२५-२६), लो.टि. टरमिनल- हुबली (व्हाया-पनवेल-सोलापूर)(१७३२१-२२), पुणे-इंदोर (व्हाया-पनवेल-वसई मार्गे (१९३११-१२), पुणे-मुंबई (प्रगती एक्सप्रेस)-(१२१२५-२६), पनवेल-पुणे पॅसेंजर (५१३१७-१८)**

# 'कायस्थ स्पंदन'चे पुनर्प्रकाशन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेलच्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाचे मुखपत्र असणारे कायस्थ स्पंदन हे त्रैमासिक मंगळवार (दि. ३ मे) अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर वाचकांच्या सेवेत पुन्हा एकदा रुजू झाले. पुनर्प्रकाशन सोहळा मुक्ताताई किशोर (राजू शेठ) गुप्ते यांचे हस्ते श्री लक्ष्मीनारायण मंदिरात झाला.

बुद्धी, शौर्य आणि ईमान यांचे उपजतच वरदान असणाऱ्या या समाजाच्या अंतर्गत परिसंचरण करण्याच्या उद्देशाने कायस्थ स्पंदन चे प्रकाशन करण्यात येते. डिजिटल स्वरूपामध्ये प्रसिद्ध होणार असल्याकारणाने राज्यासह देशाच्या सीमा ओलांडत देश-विदेशातील कायस्थ बांधवांपर्यंत हे प्रकाशन पोहचणार आहे. कोविड कालखंडात अख्खे जग थांबले असताना संपादकीय मंडळाने कायस्थ स्पंदनचे प्रकाशन हेतुपुरस्सरपणे थांबविले होते. विशेष म्हणजे पुनश्च हरिओम करताना कायस्थ स्पंदने हे डिजिटल स्वरूपामध्ये वाचकांपर्यंत पोहचणार आहे.

या वेळी पनवेल सीकेपी समाजाचे उपाध्यक्ष, पत्रकार नितीन देशमुख आणि संपादिका मीनल रणदिवे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला खजिनदार श्रीकृष्ण चित्रे, सचिव गिरीश गडकरी, विश्वस्त महेश कर्णिक, उल्हास शृंगारपुरे, सहसचिव संदीप देशमुख आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री लक्ष्मीनारायणाच्या चरणाशी त्रैमासिकाचे पहिले पुष्प अर्पण केल्यानंतर मुक्ताताई गुप्ते यांनी अंकाचे अनावरण केले. संपादकीय मंडळ सदस्य तथा माजी सचिव मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. मीनल रणदिवे यांनी आपल्या मनोगतातून मुद्रित प्रकाशना ऐवजी डिजिटल प्रकाशन करण्याच्या निर्णयाबाबत उपस्थितांना अवगत केले. मुक्ताताई गुप्ते यांनी कायस्थ स्पंदन च्या पहिल्या डिजिटल अंकास मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच या प्रकाशनाचा त्रैमासिक ते दैनिक हा प्रवास लवकरात लवकर पूर्ण होवो अशी सदिच्छा व्यक्त केली. शिरीष सबनीस यांनी श्री लक्ष्मीनारायणाची सुंदर छबी वापरून मुखपृष्ठ आरेखीले असून अत्यंत कल्पक पद्धतीने अक्षर जुळवणी केल्याने कायस्थ स्पंदनचा पहिला डिजिटल अंक अत्यंत वाचनीय झाला आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**

***अ.*** नटराजन चंद्रशेखरन ***आ.*** राकेश झुनझुनवाला
***इ.*** रमेश दमाणी ***ई.*** नंदन निलकेणी

**२. एलआयसीच्या आधी भारतातील सर्वात मोठा आयपीओ कोणता होता?**

***अ.*** कोल इंडिया ***आ.*** रिलायन्स पॉवर
***इ.*** पेटीएम ***ई.*** एसबीआय कार्ड

**३. घर, ऑफिस किंवा १९० देशांमध्ये प्रवास करतानाही कर्मचारी काम करू शकतील, अशी परवानगी देणाऱ्या कंपनीचे नाव काय?**

***अ.*** एअर बीएनबी ***आ.*** गुगल
***इ.*** फेसबुक ***ई.*** मायक्रोसॉफ्ट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

संपादकीय

# हिंसाचाराला पाठिंबा नाही

मशिदींवरील भोंग्यांच्या विरोधात छेडलेले आंदोलन सुरूच राहणार असल्याचा पुनरुच्चार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी बुधवारी केला. त्यांच्या आवाहनानुसार काही ठिकाणी मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले तर काही ठिकाणी त्यांना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले. हनुमान चालिसाचे पठण करणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्या आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिक्षेपकांविषयीच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधातही कारवाई करण्याची धमक दाखवावी अशी भावना यासंदर्भात जनमानसात व्यक्त होते आहे.

**मशिदींवरील भोंग्यांचा विषय हा धार्मिक नाही तर सामाजिक आहे असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी अनेक वेळा ठामपणे सांगितले आहे. राज ठाकरे यासंदर्भात काय म्हणतात याहीपेक्षा सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात काय आदेश दिला आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यास न्यायालयाने स्पष्ट शब्दांत मनाई केली आहे. तसेच दिवसा व रात्रीच्या आवाजाच्या पातळीची मर्यादाही स्पष्ट केली आहे. असे असताना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाठिशी घालते हे लांगुलचालन नव्हे तर आणखी काय आहे? राज ठाकरे यांनी सध्या घेतलेली भूमिका खरे तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी केव्हाच मांडली होती. रस्त्यांवरील नमाज आणि मशिदींवरील भोंगे या दोहोंना त्यांनी विरोध दर्शवला होता. कुणाचाही धर्म विकासाच्या आड येता कामा नये, किंवा अन्य कुणाला त्रासदायक ठरता कामा नये असेच ते म्हणत. परंतु बाळासाहेबांच्या या भूमिकेचे सध्या सत्तेच्या धुंदीत मश्गुल असलेल्या शिवसेनेला विस्मरण झाले आहे. कदाचित शिवसेनेला बाळासाहेबांच्या विचारांचा हा वारसा सध्या गैरसोयीचा असावा. तीन चाकी सरकारची सत्तेच्या खुर्चीवरील पकड ढिली होऊ नये म्हणून त्यांनी सध्या हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार या दोन्हीला सोडचिठ्ठी दिली आहे अशी टीका जर कुणी करत असेल तर त्यात वावगे ते काय? भारतीय जनता पक्षाची या संदर्भातील भूमिका अगदी सुस्पष्ट आहे. कुठल्याच प्रकारच्या हिंसाचाराला वा दंगलखोरीला भाजपने कधीही पाठिंबा दर्शवलेला नाही. कायदा कुणीही हातात घेऊ नये हे जितके खरे, तितकेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले पाहिजे असा आग्रह धरणे हेही योग्यच आहे. एकीकडे महाराष्ट्रात भोंग्यांवरून राजकीय वातावरण तापलेले असताना उत्तर प्रदेशातील योगी सरकारने मात्र शांतपणे मशिदींवरील भोंगे उतरवले आहेत. तेथील मुस्लिम समाजानेही यासंबंधात सहकार्य केले असे दिसत असताना, महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार मात्र मशिदींवरून अजान म्हटली जाण्याच्या बाबतीत आग्रही का, असा सवाल राज्यातील जनतेला पडतो आहे. उत्तर प्रदेशात आतापर्यंत एक लाख भोंगे उतरवण्यात आल्याची माहिती तेथील मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंगळवारी दिली. रस्त्यावरील नमाजच्या बाबतीतही योगी सरकारने अशीच जनतेच्या हिताची भूमिका घेतली आहे. भारतीय जनता पक्ष कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही. सर्व धर्मांचा समान आदर राखण्याबाबत भाजप आग्रही आहे आणि योगी सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून हेच दाखवून दिले आहे. परंतु विशिष्ट समाजाच्या लांगुलचालनावर भिस्त असणाऱ्या पक्षांना मात्र अशी नि:संदिग्ध भूमिका घेणे परवडणारे नाही. त्यामुळेच राज्यातील आघाडी सरकार या प्रश्नी तोडगा काढण्यासाठी पुढे येताना दिसत नाही हेच खरे.**

# कोतवाल धरणाला सुधारित प्रशासकीय मान्यता



खबरबात

शैलेश पालकर

राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण लघुपाटबंधारे स्थानिकस्तर मंडळ ठाणे यांनी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग माणगाव जि.रायगडच्या माध्यमातून सन २००८-२००९ दरम्यान तयार केलेल्या टिपणी अहवालानुसार पोलादपूर तालुक्यातील विविध धरणांबाबत देवळे लघुपाटबंधारे योजना, लोहारे लघुपाटबंधारे योजना, तुर्भे खोंडा लघुपाटबंधारे योजना, किनेश्वरवाडी लघुपाटबंधारे योजना, चांभारगणी महाळुंगे लघुपाटबंधारे योजना, कोतवाल लघुपाटबंधारे योजना, कोंढवी साठवण तलाव आणि बोरघर लघुपाटबंधारे योजना सुरू होण्यासंदर्भात अहवाल तयार करण्यात आला होता.

त्यानंतर या धरणांच्या कामांच्या निविदा अथवा कोणतीही कार्यवाही सुरू नसताना कथित ठेकेदार आणि त्यावर काम करण्यासाठी संबधित विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अशी यंत्रणा कागदोपत्री हलवाहलव करीत होते. कोणत्याही योजनांचे प्रत्यक्षात काम सुरू झाले नसताना २०१८ मध्ये या योजनांच्या कामांचे नारळही पोलादपूर तालुक्यात फुटले. जमिनी खरवडून माती, दगडी आणि झाडे तोडून धरणाचे काम सुरू असल्याचा आभास सुरू झाला. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्याबाबत कोणतीही तरतूद नसताना ४८ लाख एकरी काय मागताय, ८० लाख मागा अशी चिथावणी देऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत बैठका झाडल्या. या बैठकांचे फलित काहीच निष्पन्न नसताना गौणखनिज उत्खनन आणि वनविभागाच्या नियमांची अवहेलना मोठ्या प्रमाणात होत राहिली. याखेरीज महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे रानबाजिरे आणि हेटवणे पेणच्या अंतर्गत कालवली धारवली धरणाचे काम पोलादपूर तालुक्यात सुरू होते. यात रानबाजिरे धरणाचे काम पूर्णत्वास गेले. मात्र अन्य कामांची अवस्था धरणांची स्वप्ने दाखवून शेतकऱ्यांची लूट करण्याचा प्रकार होता. किनेश्वर धरणाबाबत तर ठेकेदारानेच शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घेऊन सरकारी भूसंपादनाचा मोबदला स्वत: मिळविण्याची तयारी दर्शविली आहे.

अलिकडेच पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथे मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ. प्रवीण दरेकर यांच्या मागणीनुसार मृद व जलसंधारण विभागाच्या बैठकीत २७ बंधारे व एक साठवण टाकी मंजुरीची मागणी झाली.

दुसरीकडे, मृद व जलसंधारण विभागाने विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आ. प्रवीण दरेकर यांच्या मागणीनुसार कोतवाल लघुपाटबंधारे योजनेच्या धरणाची सुधारित प्रशासकीय मान्यता देवून येत्या दोन महिन्यांमध्ये धरणाच्या कामाला वेग देण्यासंदर्भात आदेशही जारी केले आहेत.

मात्र, ही बैठक कशासाठी याचे आकलन न झालेल्या केवळ सत्तेत असलेल्या एका आमदारांनी २७ बंधारे व एक साठवण टाकी मंजूर करण्याचे मागणीपत्र संबधित मंत्र्यांना दिले.

महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी वसुधा जाधव यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आ.प्रवीण दरेकर यांच्या मागणीनुसार पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथील मंजूर झालेल्या प्रकल्पातील समस्या सोडविण्यासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते दरेकर, अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता प्रादेशिक क्षेत्र पुणे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ठाणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी ठाणे यांना दिली.

त्यानुसार बुधवारी मृद व जलसंधारण विभागाच्या इमारतीमधील दालनामध्ये विस्तारित कक्षात सर्व संबंधितांनी मंजूर प्रकल्पाच्या तात्काळ प्रकरणाच्या निविदा कार्यवाहीपासून आजमितीपर्यंतच्या सविस्तर टिपणीची माहितीसह उपस्थित राहण्यास सुचित करण्यात आले होते. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ. प्रवीण दरेकर यांनी कोतवाल बुद्रुक येथील प्रकल्प कार्यान्वित होण्यासंदर्भात झालेल्या दिरंगाईबाबत चर्चा करून प्रकल्प मार्गी करण्यासंदर्भात महत्वाच्या निर्णयाप्रत ही आढावा बैठक नेली.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते तथा पोलादपूर तालुक्यातील कोतवालचे भुमिपूत्र आ.प्रवीण दरेकर यांनी या बैठकीत विरोधी पक्षाचे नेते असूनही कोतवाल लघुपाटबंधारे योजनेच्या धरणाची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यात यश मिळविल्याने आता पोलादपूर तालुक्यातील अन्य रखडलेल्या धरण प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या शक्यतेमुळे पोलादपूरकरांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

दरम्यान शासनाकडून पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथील धरणासाठी सर्वेक्षण होऊन प्रस्ताव सादर झाला आहे. याखेरिज, तालुक्यात ढवळे, कामथे येथेही धरण प्रकल्प प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

देवपूर-गांजवणे येथे धरणासह जलविद्युत प्रकल्प करण्यासाठी सतत पाठपुरावा सुरु होता. पोलादपूर तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहाता येथे अधिक जमीन धरणामध्ये बुडीताखाली गेल्यास शेतीसाठी जमीन पुरेशी नसेल म्हणून येथे लघुपाटबंधारे प्रकल्प होण्याची गरज अधिक आहे.

शासनाने आधी पुनर्वसन मगच धरण अशी भूमिका घेतल्याने यापुढे शेतकऱ्यांचा धरणप्रकल्पांना विरोध असण्याचे कारण राहणार नाही.

पोलादपूर तालुक्यातील नियोजित धरण प्रकल्पांसाठी एकही गांव उठणार नसल्याने तुरळक शेतकऱ्यांचा काही कारणाने विरोध होण्याची शक्यता असली तरी त्यास अन्य शेतकरीच विनंती करून राजी करतील, अशी परिस्थिती आहे.

एकूणच स्थानिक शेतकऱ्यांच्या आता आशा पल्लवीत झाल्या आहेत, मात्र धरणाचे कथित ठेकेदारच जमिनी खरेदी करू लागल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुढे काय, असा सवाल निर्माण झाला आहे. याकडेही लक्ष देण्याची मागणी यानिमित्ताने जोर धरु लागली आहे.

देवळे धरणाची दुरवस्था आणि धारवली कालवली धरणाची रखडपट्टी यासंदर्भात अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. पोलादपूर तालुक्यात जमिनी विकण्याच्या प्रकारांमुळे भुमिपुत्रांच्या हातातून निसटू लागला आहे. याचे भान आता भुमिपुत्रांनाही राहिले नाही, ही खरी शोकांतिका आहे. दरम्यान तालुका सुजलाम् सुफलाम् होईपर्यंत शेतजमिनी किती शिल्लक राहतील आणि त्यांची मालकी कोणाकडे असेल? हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान कोतवाल लघुपाटबंधारे योजनेच्या धरणाची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ. प्रवीण दरेकर यांना यश आल्याने आता पोलादपूर तालुक्यातील अन्य रखडलेल्या धरण प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळेल अशी आशा पोलादपूरकर तालुकावासियांमध्ये व्यक्त होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### असा मिळवा इंटरनेट स्पीड

स्मार्टफोन हा एक मोबाईल फोनचा प्रकार आहे. स्मार्टफोनमध्ये उच्चस्तरीय क्षमता आणि संगणकाशी साधर्म्य असणारी कार्यप्रणाली असते. स्मार्टफोनची उद्योगमान्य व्याख्या देणे तसे कठीण आहे. काही लोकांच्या मते स्मार्टफोन पूर्णतः संचालन प्रणालीवर चालतात तर काहींच्या मते ईमेल, इंटरनेट, मल्टिमीडिया, रेडियो, ई-बुक रीडर, इत्यादी सुविधा असणारे मोबाईल फोन म्हणजे स्मार्टफोन होय. नोकिया, ॲपल, ब्लॅकबेरी, सॅमसंग, एलजी, सोनी एरिक्सन, मोटोरोला, एचटीसी, डेल आदी मोबाईल उत्पादक कंपन्या स्मार्टफोन बनवण्यात अग्रेसर आहेत. गूगलचा ॲन्ड्रॉइड, नोकियाचा सिंबियन, एपलचा आय.ओ.एस्, मायक्रोसॉफ्टचा विंडोज फोन ७ आणि विंडोज मोबाईल, ब्लॅकबेरीचा ब्लॅकबेरी ओ.एस., इत्यादी आघाडीच्या कार्यप्रणाली खासकरून स्मार्टफोनसाठी तयार करण्यात आल्या आहेत. आजच्या युगात स्मार्टफोन आणि इंटरनेट वापरत नाही असा क्वचितच कोणी असेल. परंतु अनेकदा असे घडते की, अनेकवेळा आपल्या स्मार्टफोनमध्ये इंटरनेट वेग मिळत नाही. स्पीड नसल्याने व्हिडिओ पाहताना किंवा काम करताना कंटाळा येतो. महत्वाचे काम करत असताना इंटरनेट स्पीड नसल्याने कामात व्यत्यय येतो. त्यामुळे तुम्ही स्मार्टफोनच्या स्लो इंटरनेट स्पीडमुळे हैराण असाल, तर सिम कार्ड वापरण्याची योग्य पद्धत जाणून घ्या. यावेळी तुम्हाला फोनमध्ये इंटरनेटचा स्पीड मिळेल. त्यासाठी एक काम करावे लागणार आहे. अनेक लोकांना त्यांच्या स्मार्टफोनमध्ये नेटवर्कची समस्या नेहमीच असते. या समस्येमुळे इंटरनेटचा स्पीड इतका कमी होतो की काहीही करता येत नाही. व्हॉट्सॲपवर पाठवलेला 'हाय' मेसेज किंवा कोणतीही इमेजही कित्येक मिनिटे पुढे जात नाहीत. त्यामुळे अनेक मोबाईल यूजर्स त्रस्त होतात. काहीवेळा रागाने सिमही बदलून टाकतात. दुसऱ्या कंपनीचे कार्ड घेतात. मात्र, इंटरनेचा त्रास काही संपत नाही.




त्रस्त होण्याची गरज नाही- नेट चांगले मिळत नसल्याने बऱ्याचवेळा कस्टमर केअरला फोन केला जातो. मात्र, तिथेही तुम्हाला जास्तीचा वेळ द्यावा लागतो. त्यामुळे त्रासात अधिक भर पडते. केअरला फोन लागला तरी प्रश्न कायमचा सुटत नाही. त्यामुळे जर तुम्हीही या समस्येचे त्रस्त असाल तर आता तुमची समस्या संपणार आहे, कारण तुम्हाला एक सोपी युक्ती लवकरच सांगण्यात येणार आहे, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमच्या स्मार्टफोनचा इंटरनेट स्पीड वाढवू शकता.

# सांस्कृतिक वारशाला प्रदर्शनाचे कोंदण



ठाणे येथे टाऊन हॉलमध्ये सुरू असलेले कोकण विभागीय विकास प्रदर्शनाला सामान्य नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सामान्य ठाणेकरांचे शतकी वाटचाल करणाऱ्या टाऊनहॉल बरोबर असलेले नाते अधिक घट्ट होण्यासाठी हे विकास प्रदर्शन उपयुक्त ठरत असल्याचे दिसत आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने अनेक ज्येष्ठ नागरिक टाऊन हॉलचे बदलेले रुपडे पाहून हरवून जात आहेत. मंगळवारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव दीपक कपूर यांनी या विभागीय प्रदर्शनाला भेट दिली. ठाण्यातल्या ज्येष्ठ संपादक, पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. ज्येष्ठ सनदी अधिकारी असलेल्या कपूर यांच्या वागण्या बोलण्यातला साधेपणा अनेकांना सुखावून गेला.

टुमदार कौलारू बंगला असलेला टाऊन हॉल या शहराची सांस्कृतिक ओळख बनून गेला आहे. या पुरातन वास्तुचे नुतनीकरण करताना त्यांचे पुरातन सौंदर्य जपत त्याला आधुनिकतेचा साज चढविण्यात आल्याने वास्तू आणि हॉल सांस्कृतिक वैभवात भर पडत आहे.

मी इतिहासाचा विद्यार्थी आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतीचे नूतनीकरण इतक्या सुंदर पद्धतीने करण्यात आले आहे की टाऊन हॉलसारखी सुंदर वास्तू मी पाहिली नाही, अशी ही सांस्कृतिक वारसा समृद्ध करणारी वास्तू आमच्या विभागीय प्रदर्शनासाठी मिळाली याचे समाधान असल्याची भावना प्रधान सचिव दीपक कपूर यांनी यावेळी व्यक्त केली. या वास्तुचे प्राचीन सौंदर्य जपत हुबेहुब दगडी बांधकामासाठी खास नेवासा येथून दगड आणून काम करणाऱ्या ठेकेदार मोहन पाटील यांनी यावेळी प्रधान सचिव कपूर यांचा सत्कार केला. प्रदर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या स्वागतासाठी कलाकार धनंजय माने यांनी साकारलेली रांगोळी लक्षणीय ठरली. सायंकाळी चारच्या सुमारास कपूर यांचे प्रदर्शनस्थळी आगमन झाले. कोकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी त्यांचे स्वागत केले. टाऊन हॉलच्या दगडी बांधकामाच्या पार्श्वभूमीवर तटबंदी असलेल्या किल्ल्याच्या प्रतिकृतीवर शासनाच्या विविध विभागांनी केलेल्या कामगिरीची सचित्र मांडण्यात आली आहे. प्रदर्शनाच्या थीमला साजेशी अशी जागा निवडल्याबद्दल महासंचालकांनी समाधान व्यक्त केले. प्रदर्शन पाहिल्यानंतर महासंचालकांनी ठाण्यातील ज्येष्ठ संपादक कैलास म्हापदी, मिलिंद बल्लाळ आणि पत्रकार यांच्याशी संवाद साधला. स्थानिक पातळीवरील घडामोडी शासनापर्यंत पोचविण्यात स्थानिक दैनिकांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्याकडून अचूक माहिती व जनतेची मते शासनाला कळतात. त्यामुळे लघु व मध्यम दैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री व विभागाच्या राज्यमंत्री आग्रही आहेत. लहान मोठ्या दैनिकांच्या पत्रकारांचे अनेक प्रश्न आहेत. मात्र, मागील तीन महिन्यात पत्रकारांच्या वैद्यकीय बिलांची कामे तातडीने निकाली काढण्यात आली. पत्रकारांसाठी आणखी कोणत्या कल्याणकारी योजना आणता येतील यावर विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

**-अजय जाधव,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

### उच्चपदस्थ व्यक्तींचा असा अनुभव

उच्चपदस्थ व्यक्ती या त्यांच्या अनुभवाने, कर्तृत्त्वाने मोठ्या बनतात. सामान्य नागरीक, सहकारी यांच्याविषयी असलेल्या संवेदनशीलतेमुळेही ते लक्षात राहतात. याचा अनुभव काल आला. प्रधान सचिवांच्या भेटीचे ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाचे छायाचित्रकार धनंजय कासार छायाचित्रण करीत होते. ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाला भेट दिल्यानंतर ते टाऊन हॉलकडे जायला निघाले. छायाचित्रकार कासार यांना त्यांनी लगबगीने जाताना बघितले. प्रदर्शन पाहत असताना प्रधान सचिवांना आपल्या कॅमेऱ्यात कैद करतानाची धडपड ते पाहत होते. पत्रकारांशी संवादानंतर समुह छायाचित्र काढण्यात आले. त्यानंतर विभागीय कर्मचाऱ्यांसमवेत देखील समुह छायाचित्रण झाले. युवा पत्रकार देखील आम्हाला तुमच्या सोबत छायाचित्र काढायचे असे कपूर यांना म्हणाले. सगळ्यांचे फोटोसेशन झाल्यानंतर शेवटी प्रधान सचिव छायाचित्रकार कासारांना म्हणाले, इकडे या माझ्या सोबत फोटो काढा, गेल्या दोन तासापासून तुमची लगबग मी पाहत आहे. प्रधान सचिवांच्या ऑफरमुळे कासार हरवून गेले. दोघांचाही फोटो झाला. त्यानंतर कपूर यांनी आपल्या पर्सनल ट्विटर हॅण्डलवरून प्रदर्शन आणि पत्रकार संवादाविषयी फोटो आणि मजकूर ट्विट केला. इतकेच नाही तर छायाचित्रकार कासार यांच्या धडपडीचे कौतुक करीत त्या दोघांचा फोटो ट्विट करून कपूर यांनी सुखद अनुभव दिला.

**क्लिक...क्लिक...!**



(छाया: सुधीर नाझरे)

**मुरुड : शहरातील अंतर्गत रस्त्यांच्या कामाकरिता शासनाकडून पाच कोटी मंजूर झाले. या रकमेत बाऊल खलाटी रस्ता नसल्याने या ठिकाणच्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. गेली १२ वर्षे रस्त्यांवर डांबरीकरण झाले नाही. तरीही रस्त्याला मंजुरी न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**

## आरोग्य प्रहर

### निद्रानाशामुळे डोळ्यांवर होतात गंभीर परिणाम

निद्रानाश म्हणजे नैसर्गिक दैनंदिन जीवनचक्रामध्ये वेळेवर झोपे न येणे, झोप आल्यानंतर ती बराच वेळ टिकवून ठेवता न येणे, झोपेची वेळ पूर्ण झाली तरी सुद्धा झोप पूर्ण न झाल्यासारखे वाटणे आणि काही पेशंटमध्ये अर्धवट जाग येऊन पुन्हा झोप न येणे याला 'निद्रानाश' असे म्हटले जाते.

निद्रानाश हा आजार मानसिक आरोग्याशी निगडित आहे. प्रामुख्याने सध्याचे जीवन धकाधकीचे आणि ताणतणावाचे आहे. कोणत्या ताणाचा अथवा सततच्या धावपळीचा शरीराच्या आरोग्यावर नेमका कोणता परिणाम होईल, हे निश्चित सांगता येणार नाही, पण जेव्हा लक्षणे दिसू लागतात त्यावेळी आजार डोके वर काढू लागतो.



खऱ्या अर्थाने सध्याच्या धावपळीच्या आयुष्यामुळे माणूस एक प्रकारचे मशीन झाला आहे. तो काम करू लागतो, मशीनसारखा तो धावतो. नोकरीवरून घरी येताना अथवा नोकरीला जाताना बसमध्ये प्रवास करताना बसल्या बसल्या डुलकी लागते. त्या दहा मिनिटात किंवा अर्धा तासाच्या डुलकीने तात्पुरते खूप फ्रेश वाटते. पण नंतर अनेक व्यक्तींना झोप पूर्ण न झाल्यासारखे वाटते. निद्रानाशाचा डोळ्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. दीर्घकालीन निद्रानाश विकारामुळे डोळ्यांची गंभीर समस्या निमार्ण होऊ शकते. मानवी शरीरासाठी झोप अत्यावश्यक आहे. व्यवस्थित झोप नसणे, सातत्याने झोपमोड होणे, गाढ झोप न लागणे, रात्रभर जागे राहणे आदी कारणांमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर दुष्परिणाम होतातच, मात्र निद्रानाशामुळे डोळ्यांवरही गंभीर परिणाम होऊ शकतात, असे संशोधन अमेरिकी आणि चिनी वैद्यकीय तज्ज्ञांनी नुकतेचे केले. निद्रानाशामुळे डोळे कोरडे होणे, खाज सुटणे यासारखे दुष्परिणाम होतात, असे या संशोधकांनी सांगितले.

निद्रानाशाचा डोळ्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. दीर्घकालीन निद्रानाश विकारामुळे डोळ्यांच्या गंभीर समस्या निमार्ण होऊ शकतात. डोळ्यांच्या बाहुलीवर एक पारदर्शक पडदा असतो, त्यास कॉर्निया किंवा नेत्रपटल असे म्हणतात. नेत्रपटल हे संवेदनाक्षम पेशींनी बनलेले असते. डोळ्यांचे कार्य आणि आरोग्य नेत्रपटलावर अवलंबून असते. मात्र निद्रानाशामुळे नेत्रपटलाला कोरडेपणा येतो आणि त्यामुळे डोळ्यांचे आजार सुरू होतात. निद्रानाश जर दीर्घकालीन असेल तर डोळ्यांवर गंभीर परिणाम होऊन दृष्टी अधू होण्याचाही धोका असतो, असे या संशोधकांनी सांगितले.

# सुरूंग स्फोटाने ढेकू गाव हादरले; चार घरांचे नुकसान

**खालापूर : प्रतिनिधी**


मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात डोंगर पोखरण्यासाठी बुधवारी (दि. ४) दुपारी करण्यात आलेल्या भूसुरुंग स्फोटामुळे महाकाय दगड, गोटे शेजारी असणाऱ्या ढेकू (ता. खालापूर) गावात जाऊन पडले. त्यामध्ये चार घरांचे नुकसान झाले. सुदैवाने घरात कोणीही नसल्याने मोठा अनर्थ टळला.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या नव्या चौपदरी मिक्सिंग लिंकचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी डोंगर पोखरण्याचे काम जोमाने सुरू आहे. या कामात मोठ्या प्रमाणात भूसुरुंग स्फोट घडवून आणले जात आहेत. या मार्गाचे काम करणाऱ्या अफकॉन कंपनीने बुधवारी (दि. ४) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास भूसुरुंग स्फोट केले. त्यामुळे उडालेले महाकाय दगड गोटे द्रुतगती महामार्गाशेजारी असणाऱ्या ढेकू गावात जावून पडले. त्यामध्ये चार घरांचे नुकसान झाले.

त्यामुळे संतप्त झालेल्या चिंतामण चव्हाण, सुरेश पाटील यांच्यासह ५० ते ६० ग्रामस्थांनी मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. तसेच कोणत्याही प्रकारची खबरदारी न घेता भुसुंरुग करण्याऱ्या अफकॉन कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालीत जाब विचारला. या वेळी त्यांनी नुकसान झालेल्या घरांची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणीही केली.

खोपोली पोलीस, बोरघाट पोलिसांनी ढेकू गावातील रहिवाशांना शांत राहण्याचे आवाहन केले. या दरम्यान मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक अर्धा तास खोळंबली होती.

दरम्यान, मुंबई-पुणे द्रुतगतीवर नवीन मिक्सिंग लिंकचे काम सुरू असल्याने दिवसातून दोन वेळा भुसुरुंग केले जात असून त्या वेळी किमान अर्धा तास वाहतूक रोखली जात असल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र आहे.



(छाया : अरूण नलावडे)

**अफकॉन कंपनी, खोपोली पोलीस आणि ढेकू ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक गुरुवारी दुपारी १२ वाजता खोपोली पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली असून या बैठकीत झालेल्या नुकसानीची भरपाई व भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना व चर्चा करण्यात येणार आहे.**

**-सुरज पाटील, ग्रामस्थ, ढेकू ता. खालापूर**

**सुरूंग स्फोटामुळे ढेकू गावातील घरांचे नुकसान झाले असेल तर त्याची माहिती घेऊन संबंधीतांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.**

**-आयुब तांबोळी, तहसीलदार, खालापूर**

## मुरुड समुद्रकिनाऱ्यावर तेल तवंग, पर्यटक त्रस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

लहान आकाराचे डांबरगोळे आणि तेलजन्य पदार्थांचे अवशेष पसरल्याने मुरुडचा संपूर्ण समुद्रकिनारा पुन्हा एकदा विद्रुप झाला आहे. त्यामुळे पर्यटक व स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

आगरदांडा-दिघी जेटीजवळ येणाऱ्या मोठ्या जहाजांमधून होणारी तेल गळती व बंदरात तेल लावून ठेवलेल्या बोटींमुळे समुद्राच्या पाण्यात तेल पसरते. हा तेलाचा तवंग लाटांसोबत किनाऱ्यावर येतो. काही वेळा हा तवंग वाळूच्या संपर्कात आल्याने त्यांच्या डांबरसदृश गोळ्या तयार होतात. मुरूड समुद्रकिनारी केवळ १५ दिवसांच्या अंतराने तेल तवंग आणि डांबरसदृश गोळ्या पसरल्या असून, त्यामुळे हा समुद्रकिनारा विद्रूप झाला आहे. पाय टाकावा तिथे ऑइल असल्याने पर्यटक व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा आहे. त्यामुळे मासेमारीसोबत पर्यटनावरही परिणाम झाला आहे.

महिन्यातून दोनवेळा समुद्रकिनारी ऑइल आले तरी शासकीय यंत्रणा मात्र झोपेत आहेत. ऑइल वारंवार का येत आहे, याची साधी चौकशीसुद्धा केली जात नाही. महाराष्ट्र मेरी टाइम बोर्ड व मत्स्य विभाग कोणतीही चौकशी करीत नसल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

सध्या मुरुड नगर परिषदेकडून समुद्रकिनाऱ्यावर पसरलेल्या ऑइलवर जेसीबीच्या सहाय्याने समुद्राची वाळू टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

## श्रीवर्धन समुद्रकिनाराही विद्रूप

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

काल सायंकाळपासून श्रीवर्धन समुद्रकिनारी ऑइल युक्त पाणी येत आहे. त्यामुळे हा किनारा पूर्णपणे विद्रुप झाला आहे.

नागरिक किंवा पर्यटक पाण्यामधून या धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावर आल्यानंतर त्यांच्या पायाला लागलेल्या ऑईलचे ठसे उमटलेले दिसतात. समुद्राच्या पोहायला गेल्यानंतर ऑईलयुक्त पाण्यामुळे अंगाला चिकटपणा येत असून, अंगाला खाज सुटण्याचा प्रकारदेखील घडत आहेत. महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाने याबाबत चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे.


महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड
web -kidc.maharashtra.etenders.in & email-eerid24@gmail.com
ई-निविदा सूचना क्र. ०१ सन २०२२-२३

**कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड (दूरध्वनी क्र. ०२१९४/२५०८५७)** हे खाली दर्शविणेत आलेल्या कामाकरिता संगणक ई-निविदा प्रणाली नुसार ब १ नमुन्यात निविदा मागवित आहेत. सदर निविदा भरण्यास सक्षम असलेल्या पात्र कंत्राटदारांनी https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून निविदा कागदपत्रे उपलब्ध करून घ्यावीत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची निविदा किंमत रु. | इसारा/ बयाणा रक्कम रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | कुंभे जलविद्युत प्रकल्प, ता. माणगाव जि. रायगड अंतर्गत कुंभेवाडी रस्ता सा. क्र. ० ते ३.५०० मी. चे डांगरीकरण करणे. | १,२९,५००/- (GST वगळून) | १,२९,५००/- | ०२ महिने | रु. २०००/- +रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा विक्री, डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा कालावधी | दि. ०५/०५/२०२२ (सकाळी १०.००) ते दि. ११/०५/२०२२ (संध्याकाळी १८.००) वाजेपर्यंत |
| २. | तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड दि. १३/०५/२०२२ (सकाळी ११.००) वाजता. |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रक तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेतस्थळावरच पाहता येतील. एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(इंजि. राकेश धाकतोडे)
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड



जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे-आसरे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत जिचे विद्यमान मालक **१. श्री.नारायण देवजी कातकरी, २. श्री नथु उर्फ नथुराम जानक्या पवार उर्फ कातकरी, ३. श्रीम. सिताबाई सोनु पवार उर्फ भागी सोन्या कातकरी, ४. श्रीम. बारकी गोपाळ पवार, ५. श्रीम. जीजी कृष्णा पवार, ६. श्रीम. शिमगी परशुराम हिलम,** नदोडे कातकरवाडी, नदोडे ता. खालापुर, जि रायगड, ४१०२०६ यांचे बरोबर ९९ वर्षांचा करारनामा करण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे
**मौजे - आसरे तालुका - खालापुर, जिल्हा रायगड.**

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्र./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे | संपुर्ण हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | १७ | | | |
| | जिरायत | ४.३४.०० | ४.५० | |
| | पोटखराब | ०.६२.०० | | |
| | | | एकुण | ४.९६.०० |
| | | | पैकी | ४.१६.०० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या ९९ वर्षांचा करारनामा व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या ९९ वर्षांचा करारनामाचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
दिनांक : ०४/०५/२०२२ **ॲड. कांचन एस. पाटील**

**पत्ता :** ऑफिस नं २०१, साई पॅरेडाईस, जी. पी. पारसिक बँके वर, जुना पनवेल, जि.रायगड ४१० २०६ . फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११


## सुरेखा भणगे कर्जतच्या प्रभारी मुख्याधिकारी

**कर्जत : बातमीदार**

माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्यावर कर्जत नगर परिषदेच्या प्रभारी मुख्याधिकारी पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांची वसई-विरार महानगरपालिकेत उपायुक्तपदी बदली झाली आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या कर्जत नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदाची प्रभारी जबाबदारी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुरेखा भणगे यांच्याकडे दिली आहे.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel
**Bhagubai Changu Thakur College of Law New Panvel**
Plot No. 04, Sector 11, Khanda Colony, New Panvel (W), Navi Mumbai - 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2022-2023 (FOR SELF-FINANCE PROGRAMMES)**

**Full Time Assistant Professors for the Academic Year 2022-2023, On Purely Temporary and Ad-hoc Basis for the following subjects**

| Sr. No. | Subjects | Post | Specialization |
|---|---|---|---|
| 1 | Principal | -- | Law |
| 2 | English | CHB | English |
| 3 | Social Science | CHB | Social Science |
| 4 | Economics | CHB | Economics |
| 5 | Political Science | CHB | Political Science |
| 6 | Philosophy | CHB | Philosophy |
| 7 | Law | Full Time | Law |
| 8 | Librarian | Full Time | Library Science |

- Qualification as per the University Norms
- Applications with full details should reach to the **CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA, Plot No.08, Sector-14, CIDCO Colony, Oppt. Railway Station, Janardan A. Bhagat, New Panvel (E), 410206**
- **Last date for application - Saturday, 21st May, 2022**
- Candidatesshould submit the application in person/by post.
- If required Contact : - Mrs. Patankar Sayali **M. No. 9930718675**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**


## कर्जतमध्ये माऊलींना आंब्यांची सुबक आरास

**कर्जत : बातमीदार**

अक्षय्य तृतीयेनिमित्त कर्जतमधील माऊली निवास येथील संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या मूर्तीला भाविकांनी मंगळवारी आंब्यांची आरास केली होती.



श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा समितीच्या वतीने माऊली निवास येथे अक्षय्य तृतीया साजरी करण्यात आली. या वेळी कर्जत शहर आणि परिसर तसेच पुणे, मुंबई, पनवेल, डोंबिवलीमधील भाविक उपस्थित होते. या भाविकांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या मूर्तीला श्रद्धेने आंब्यांची आरास केली. या आराससाठी ७२५ आंबे वापरण्यात आले होते. या वेळी श्री माऊलींची षोडशोपचारे महापूजा करण्यात आली. कोरोना रोगाचा प्रादुर्भाव संपूर्ण विश्वामधून कायमस्वरूपी नष्ट व्हावा, यासाठी विश्वशांती मंत्राचे पठण करण्यात आले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित जागेच्या बदल्यात भूखंड ८२, सेक्टर-०७, क्षेत्र ७२०.०० हा भूखंड १) श्री. राम आत्माराम तारेकर २) श्री. अनंत मारुती मुंगाजी ३) श्रीमती हौसाबाई धर्मा पाटील ४) श्रीमती जयमाला अशोक जितेकर यांना वाटप करण्यात आला असून हक्कसोड पत्राद्वारे सदरचा भूखंड श्री. राम आत्माराम तारेकर यांचे नावे नोंद करण्यासाठी विना मोबदला हक्कसोड पत्र नोंदणी क्र. ३९म, दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल५-४२५७-२०२२ हे सह दुय्यम निबंधक, वर्ग-२. पनवेल-५, पावती क्र. ४५५० यांचेकडे दिनांक १४/०३/२०२२ रोजी नोंदणीकृत केले आहे.

| अ. क्र. | युनिट/ निवाडा क्र. | सर्व्हे/ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | भूधारकांचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७२ | ७/५ | ०-४५-२ हे. आर. | १ श्री. राम आत्माराम तारेकर<br>२ श्री. अनंत मारुती मुंगाजी<br>३ श्रीमती हौसाबाई धर्मा पाटील<br>४ श्रीमती जयमाला अशोक जितेकर | ७२०.०० चौ.मी. | भूखंड क्र. ८२, सेक्टर ०७, क्षेत्र ७२०.०० चौ.मी. या भूखंडाचे वाटप दि. २०/१०/२०१५ रोजी करण्यात आले असून भाडेपट्टा करारनामा दिनांक १९/०४/२०१७ झालेला आहे. |

संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्र. ८२, सेक्टर-०७, क्षेत्र ७२०.०० चौ.मी. हा भूखंड पुष्पकनगर दापोली येथे वाटपित करण्यात आलेला आहे. करारनामा दिनांक १९.०४.२०१७ रोजी निष्पादित करण्यात आला आहे. खालील तक्त्यामध्ये हक्क सोडणारे व हक्क प्रदान करणारे नमुद करण्यात आले आहेत.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींचे नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|
| १ श्री. अनंत मारुती मुंगाजी<br>२ श्रीमती हौसाबाई धर्मा पाटील<br>३ श्रीमती जयमाला अशोक जितेकर | श्री. राम आत्माराम तारेकर |

उपरोक्त दाव्यामधील हक्कसोड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सिडको दप्तरी केवळ **श्री. राम आत्माराम तारेकर** यांचेच नावाची भाडेपट्टेदार म्हणून नोंद घेण्यात येईल.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन जे भूखंडधारक आहेत ज्यांचे भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्यांची/त्यांचे नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसापर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनूसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) विभाग, तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४,** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील भाडेपट्टा करारनामा करण्यात आलेल्या भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/०५९/२०२२-२३



**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, चेसी नं. MA3EJKD1500 A35169 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AY 0038 चे मालक **श्री. विनय रमेश धनावडे** यांचे तारीख २४/०१/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती सारीका विनय धनावडे, पत्ता- बी १०१, सेलेने, एस.आर. नं. ३२, पिसोली, मोहम्मदवाडी, पुणे, पुणे शहर, पुणे, महाराष्ट्र ४११०४८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - श्रीमती सारीका विनय धनावडे, पत्ता- बी १०१, सेलेने, एस.आर. नं. ३२, पिसोली, मोहम्मदवाडी, पुणे, पुणे शहर, पुणे, महाराष्ट्र ४११०४८**



**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

एप्रिल २०२२

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मी गुंटी, श्रीकांत कृष्णा गुंटी | राजेश कृष्णा देसाई | सदनिका नं. २०७, दुसरा मजला, वैष्णवी आशिर्वाद, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल ४-३३२५-२०२२ | १७/०३/२०२२ |
| २ | शक्ती भिकाजी जाधव, अलका भिकाजी जाधव | महेंद्र एच. गमरे, प्रशांत एम. गमरे | सदनिका नं. बी २०३,दुसरा मजला, बी विंग, बि. नं. ३, कार्तिक्या पार्क को. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल १-३२७५-२०२२ | २१/०३/२०२२ |
| ३ | पुरुषोत्तम पोषन्ना गुवा | सुधीर भालचंद्र रणपीसे | सदनिका नं. ००१, तळ मजला, सी विंग, निलांबरी को. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल १-५९४१-२०२१ | ०७/०७/२०२१ |
| ४ | विष्णू सोपान भताने, व्दारका विष्णू भताने | मे. नामदेव पांडुरंग ॲण्ड कं. तर्फे भागीदार रविंद्र नामदेव मुसळे | सदनिका नं. बी १, तळ मजला, बि. नं. जी १, श्रीनिकेतन को. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल ३-४८५३-२०२२ | २२/०३/२०२२ |
| ५ | शंकर सुंदर सरोज | प्रकाश काशिनाथ पाटील | सदनिका नं. १४, पहिला मजला, वि. नं. सी ३, प्रभात को. हौ. सो. लि. युगांतक कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल १-०७७६९-२००९ | १८/११/२००९ |
| ६ | अमितकुमार रमेशराव सुर्यवंशी | मे. निंबेश्वर महादेव बिल्डर्स तर्फे कांतिलाल संतोकदास वैष्णव तर्फे उमेश का. मुंडकर | सदनिका नं. ३०३, तिसरा मजला, ए विंग, निंबेश्वर संस्कृती को. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल २-६३६२-२०१३ | ०१/१०/२०१३ |
| ७ | सिंह रौनक स्वर्ण सिंह, राजेंद्र कौर | चंद्रकांत चाहू पोपेटा | सदनिका नं. ४०५, चौथा मजला, वैष्णवी आशिर्वाद, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल २-६८०३-२०२१ | २७/०४/२०२१ |
| ८ | भिमराव संपत बेंगडे, अनुष्का भिमराव बेंगडे | विठ्ठल गंगाराम शेरखाने | सदनिका नं. ३०२, तिसरा मजला, गंगाराम कृपा, मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल २-१७८१-२०१७ | २३/०२/२०१७ |
| ९ | राजेंद्र विष्णू गोरे, कामीनी राजेंद्रे गोरे | संतोषकुमार तिवारी रीता तिवारी | सदनिका नं. १०२, पहिला मजला, साईधाम को. हौ. सो. लि., मौजे पालीदेवद (सुकापूर) | पवल ५-४२९९/२०२२ | १४/०३/२०२२ |
| १० | स्वप्निल सुरेश मसाल, सायली स्वप्निल मसाल | अजय सेहगल | सदनिका नं. ०३, सी विंग, वि. नं. ३, तळ मजला, साक्षी पार्क २ क. हौ. सो. लि., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल ५-५२०८-२०१५ | २१/०८/२०१५ |
| ११ | लिओ डेनिस सलडाना, फन्स्कीन डेनीस सलडाना | मे. माऊली प्रसाद कन्स्ट्रक्शन कं. तर्फे चंद्रकांत चाहू पोपेटा | सदनिका नं. २०५, दुसरा मजला, दत्त दर्शन, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल १-१४११-२०२० | १२/०२/२०२२ |
| १२ | नंदकिशोर लक्ष्मण शिरापुरी | श्री. चंद्रकांत चाहू पोपेटा | सदनिका नं. ३०१, तिसरा मजला, मि. क. ८९/४, मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल २-१२७४-२०२२ | २८/०१/२०२२ |
| १३ | अक्षय गणेश खांडेकर, वृषाली गणेश खांडेकर | आफाक अब्दुल समी शेख | सदनिका नं. ३०१, तिसरा मजला, वि. नं. ४, आय विंग, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल १-४४७०- | ०८/०४/२०२२ |
| १४ | चंद्रकांत गंगाराम साळवी, स्वप्ना गंगाराम साळवी | मे.देवनदी मर्कंटाईल प्रा. लि., तर्फे डायरेक्टर जुगराज बोहरा | सदनिका नं.ए ००१, तळ मजला, गंगा दर्शन को.हौ.सो.लि., मौजे पाली देवद (सुकापूर) | पवल १८३०-२०२२ | १६/०२/२०२२ |
| १५ | गीता सजीव नायर | प्रभाकर कृष्णकांत भोईर | शॉप.नं. ४, तळ जमला, बि.नं.२, गोकुळधाम कॉम्प्लेक्स को.हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल २-६७६३-२०२२ | १३/०४/२०२२ |
| १६ | वर्षा रविंद्र पिंगळे, रविंद्र सखाराम पिंगळे | संजय अनंत शहासने | सदनिका नं. एफ ०३, तळ मजला, बि.नं. २,स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को.हौ.सो.लि., मौजे शिलोत्तर रायचूर (सुकापूर) | पवल २-३८१६-२०२० | १६/०३/२०२० |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## निवडक



### महाराष्ट्र दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**उरण** : उलवे येथील केमिस्ट असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त पारंपरिक वेशभूषा करून बाईक रॅली काढण्यात आली होती तसेच फार्मसिस्ट बंधू भगिनींकरिता स्लोगन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्वकृष्ट वेशभूषा एनआरआय पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक संदीप शिरसाठ यांनी आणि सर्वकृष्ट फार्मसी व्यवसायासंबंधित स्लोगन स्पर्धेचे पारितोषिक रोहित शिंदे आणि धनश्री शिंदे या फार्मासिस्ट जोडप्याने पटकावले. संस्कृतीची जोपासना करणे, हे आपले कर्तव्य आहे, असे मत केमिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षा सीमा पाटील यांनी व्यक्त केले.



### ‘हिंद मराठा’ जिल्हाध्यक्षपदी पी. डी. देशमुख

**पनवेल** : हिंद मराठा महासंघ रायगड जिल्हाध्यक्षपदी उद्योजक पी. डी. देशमुख यांची निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले, राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड, राष्ट्रीय सरचिटणीस ॲड. किशोर बांदल देशमुख, प्रदेश अध्यक्ष सुधीर पालांडे यांच्या सुचनेनुसार कोकण प्रदेशाध्यक्ष निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त विनोदराव चव्हाण यांनी जाहीर केली. त्यांना नियुक्तीपत्र देताना राष्ट्रीय सचिव शिवाजीराव पालांडे, रायगड जिल्हा सरचिटणीस प्रथमेश सावंत, ॲड. इंद्रजित भोसले, सिंधुदुर्ग जिल्हा सल्लागार प्रभाकर परब, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव फडतरे, पत्रकार संजय कदम उपस्थित होते.

### पळस्पे येथून विवाहित बेपत्ता

**पनवेल** : पळस्पे गावातून प्रमिला खंडागळे (वय ४०) या कोणास काही न सांगता निघून गेल्याने हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रमिला खंडागळे यांचा रंग गोरा, उंची ५ फूट, डोळे तिरके, चष्मा घालते, अंगात गुलाबी साडी तसेच गळ्यात सोन्याचे गंथण व मंगळसूत्र घातले आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पनवेल पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोहवा ज्योती दुधाने यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तळोजात दररोज सात दशलक्ष लिटर पाणी वाया

## एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांची बैठकीत माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजातील पाणी प्रश्नाबाबत उद्योजकांशी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसमवेत सोमवारी (दि. २) एक समन्वय बैठक झाली. यात पाणीपुरवठ्याचा ताळेबंद अधिकाऱ्यांनी मांडल्यानंतर एकट्या तळोजाला दररोज पुरवठा होत असलेल्या पाण्यापैकी सात दशलक्ष लिटर पाणी वाया जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. याबाबत धोरणच नसल्याने उद्योजकांनी या वेळी संताप व्यक्त केला आहे.



(संग्रहित छायाचित्र)

तळोजा औद्यागिक वसाहतीत पाणी तुटवडा भासत असल्याने उद्योजकांनी मोर्चा काढण्याचा निर्धार केला होता मात्र तळोजा पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत उद्योजकांच्या प्रतिनिधींची पाण्याबाबत सोमवारी समन्वय बैठक झाली. यात तळोजा औद्योगिक वसाहतीला मिळणाऱ्या ५२ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाण्यापैकी १२ टक्के पाणी वाया जात असल्याचे समोर आले. तळोजा औद्योगिक वसाहतीत ७०० कारखाने असून त्यांना ५२ दशलक्ष लिटर पाणी एमआयडीसी पुरवठा करते. या सर्व पुरवठ्यादरम्यान एमआयडीसीचे सात दशलक्ष लिटर पाणी म्हणजेच १२ टक्के पाणी वाया जात आहे. याबाबत उद्योजकांचे प्रतिनिधित्व करणारी टीएमए (तळोजा मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन) या संस्थेचे अध्यक्ष शेखर श्रृंगारे यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

> **पाण्याविना कंपनीत बॉयलर फुटून स्फोटही होऊ शकतो. याबाबत आम्ही बैठकीत अधिकाऱ्यांना माहिती दिली. वीज, पाणी याशिवाय राज्यात उद्योगस्नेही धोरण कसे यशस्वी होईल, असा प्रश्न उद्योजकांनी केला आहे. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी पाणी वाढवून घ्या असा सल्ला दिला मात्र उद्योगांसाठी आरक्षित असलेले ५२ दशलक्ष लिटर पाणी तळोजा औद्योगिक वसाहतीला मिळाले तर ही वेळच येणार नाही. एमआयडीसीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेण्याचे ठरले आहे. त्या बैठकीत निर्णय न झाल्यास न्यायालयात जाणार आहोत.**
>
> **–शेखर श्रृंगारे, अध्यक्ष, टीएमए**

१२ टक्के पाणी म्हणजे लाखो लिटर पाणी दररोज वाया जात आहे. उद्योजकांकडून प्रति हजार लिटरला २२ रुपये तर निवासी करदात्यांकडून १० रुपये आकारले जातात. पाणी नेमके कुठे जाते याचा शोध अनेक वर्षे एमआयडीसी प्रशासन घेऊ शकले नाही. यामुळे एकीकडे पाणीटंचाई होत आहे तर दुसरीकडे शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडत असल्याकडे टीएमएचे अध्यक्ष श्रृंगारे यांनी लक्ष आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रगतशील शेतकऱ्याचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील प्रगतशील शेतकरी सज्ञन पवार यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १) रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. तहसीलदार विजय तळेकर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित केला होता.



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६२ व्या वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते तहसीलदार कार्यालयात झाला.

या वेळी कोविड काळात उत्तम कार्य केलेल्या कोविड योद्ध्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

कार्यक्रमास पनवेल प्रांत अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, अपर तहसीलदार शेतजमीन न्यायाधिकरण अभिजित खोले, गटविकास अधिकारी संजय भोये, सार्वजनिक बांधकाम विभाग सहाय्यक अभियंता श्रेणी १ एन. व्ही. भोये, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील नखाते, एकात्मिक बालविकास प्रकल अधिकारी पनवेल चेतन गायकवाड उपस्थित होते.

सज्ञन पवार यांनी पनवेलमध्ये पहिला स्ट्रॉबेरीचा यशस्वी प्रयोग राबवला होता तसेच २०२०–२१ जिल्हा भातपीक स्पर्धेमध्ये ते तालुक्यात प्रथम आले आहेत. याच स्पर्धेत जिल्ह्यामध्ये दुसरा क्रमांक त्यांनी पटकाविला आहे.

## दुचाकी अपघातात लहानग्याचा मृत्यू

### तिघे गंभीर जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या भिंतीवर धडकल्याने झालेल्या अपघातात ५ वर्षीय मुलाचा मृत्यू तर त्याचे आई–वडील व भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी (दि. ३०) कर्नाळा खिंडीजवळ घडली. पनवेल तालुका पोलिसांनी मृत मुलाच्या वडिलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या मुलाचे नाव विहान पाटील असे असून जखमी झालेल्यांमध्ये वडील तेजस पाटील (३६), आई सोनल पाटील (३२) आणि भाऊ जय ७ वर्षे या तिघांचा समावेश आहे. हे कुटुंब नेरुळ सेक्टर–१०मध्ये राहण्यास असून त्यांचे मूळगाव हे अलिबाग येथील पोयनाड येथे आहे.

तेजस हा पत्नी व दोन मुलांसह आपल्या दुचाकीवरून अलिबागला जात होता. त्याच्यासोबत मागे पत्नी सोनल, दोघांच्या मध्ये ७ वर्षीय जय तर ५ वर्षीय विहान हा तेजसच्या पुढे बसला. त्यांची दुचाकी कर्नाळा खिंडीतील नागमोडी रस्त्याच्या वळणावरून जात असताना, तेजसचे भरधाव वेगात असलेल्या दुचाकीवरून नियंत्रण सुटले. त्यामुळे दुचाकी भिंतीला धडकून चौघे जण खाली पडले व गंभीर जखमी झाले. एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यात गंभीर जखमी असलेला ५ वर्षीय विहानचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात तेजस पाटील याने भरधाव वेगात निष्काळजीपणे मोटारसायकल चालवून नेल्यामुळे हा अपघात झाल्याचे आढळल्याने पनवेल तालुका पोलिसांनी तेजस पाटीलविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## नवी मुंबई मनपा नाट्यगृहात नटराज मूर्तीचे अनावरण

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या विष्णुदास भावे नाट्यगृहात दर्शनी भागात स्थापन करण्यात आलेल्या ब्राँझ धातूच्या सहा फूट उंच मूर्तीचे अनावरण अभिनेते दामले व अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर झाले. या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार, शहर अभियंता संजय देसाई, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपायुक्त मनोजकुमार महाले, कार्यकारी अभियंता अजय संखे, वाशी विभागाचे सहायक आयुक्त सुखदेव येडवे व इतर मान्यवर उपस्थित होते.



**ब्राँझ धातूची १६५ किलो वजनाची ही सहा फूट उंच आकर्षक नटराज मूर्ती शिल्पकार रवि वाडकर यांच्या संकल्पनेतून व सजावटीतून साकारलेली आहे. या अनावरण कार्यक्रमाला नाट्यरसिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

या वेळी प्रशांत दामले यांनी स्वच्छ व सुंदर असा देशात नावलौकीक असणारे नवी मुंबई शहर नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात नेहमीच आघाडीवर आहे. येथे सुविधा निर्मितीप्रमाणेच त्या सुविधांच्या देखभालीवरही विशेष लक्ष दिले जाते असा अनुभव असल्याचे सांगत विष्णुदास भावे नाट्यगृह हे त्याचे उत्तम उदाहरण आहे, असे मत व्यक्त केले. आगामी काळात ऐरोलीतही नाट्यगृह निर्माण होत असून यामधून नवी मुंबईतील नाट्यरसिकांना आणखी एक चांगली सुविधा उपलब्ध होईल याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नवी मुंबई नावाप्रमाणेच नाविन्याला प्राधान्य देत असून अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर नाट्यदेवता नटराज मूर्तीचे अनावरण करण्याचे भाग्य आम्हाला लाभले अशा शब्दात आनंद व्यक्त करीत अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी बुकेऐवजी बूक भेट देत नवी मुंबई महानगरपालिकेने वाचन संस्कृतीचा प्रसार करण्याचा जपलेला वसा प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

## मोहोपाड्यात महावितरणकडून मान्सूनपूर्व कामांना गती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पावसाळा जवळ येऊ लागल्याने दरवर्षी मे महिन्यापासूनच मोहोपाड्यातील महावितरण कार्यालयाकडून पावसाळ्यापूर्वीची कामे सुरू होतात. त्या अनुषंगाने यावर्षीही मोहोपाडा महावितरणाचे उपअभियंता किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा रसायनी परिसरात पावसाळ्यापूर्वीची कामे जोरात सुरू करण्यात आली आहेत.

आतापर्यंत महावितरण हद्दीतील रिस ते दांडफाटा, सेबी, शिवनगर, पानशिल, भटवाडी, घोसाळवाडी, एमआयडीसी पाताळगंगा फिडर, भोकरपाडा, बारवई, खानावले, पोयंजे ते ठोंबरेवाडी या परिसरात वीजवाहिन्यांना अडथळा ठरत असलेल्या झाडाच्या फांद्या काढण्यात येत आहेत तसेच खाने आंबिवली, मोहोपाडा वाडी, मातोश्री संकुल येथे डिस्ट्रीब्युशन बॉक्स, शिवनगर सेबी येथील जंपर बदलणे, रिस बौद्धवाडा वीजपोल बदलणे, मोहोपाड्या थांब्याजवळ दोन वीज पोल, वायरिंग बदलणे, बाळाजी गार्डन येथे ट्रान्सफॉर्मर बदलणे आदी कामे करण्यात येत आहेत. यामुळे काही काळ वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता मात्र या वेळी नागरिकांनी सहकार्य केले.





परिसरातील लोंबकळत असलेल्या वीज वाहिन्या खेचून व्यवस्थित करण्यात आल्या तसेच परिसरात झुकलेल्या वीजवाहिन्या व्यवस्थित करण्याची कामे अंतिम टप्प्यात आल्याचे समजते. ऐन पावसाळ्यात रसायनी परिसरातील नागरिकांना काहीही अडचण येऊ नये यासाठी मोहोपाडा महावितरणाकडून पावसाळ्यापूर्वीची विविध कामे सुरू असल्याचे उपअभियंता किशोर पाटील यांनी बोलताना सांगितले.

## आरोग्यवर्धक शहाळ्याला उन्हाळ्यात वाढती मागणी

**उरण : वार्ताहर**

उन्हाळा आला की, लिंबू–पाणी, कोकम सरबतबरोबर आरोग्याला फायदेशीर असणाऱ्या शहाळ्याला मागणी वाढत असते. यंदा मागणी असली, तरी शहाळ्याच्या दरात प्रचंड बाढ झाली आहे. मोठे शहाळे ५० तर छोटे शहाळे हे ४० रुपयाने विकले जात आहे. वाहतुकीचा वाढता खर्च आणि वाढत्या उष्णतेमुळे दरात वाढ झाल्याचे विक्रेता नसीर खान यांनी सांगितले.



उरण शहरात आनंद नगर, चारफाटा, विमला तलाव, महात्मा गांधी पुतळ्यासमोर, पिरवाडी वाडी, सिडको चारफाटा, उरण पंचायत समितीसमोर आदी ठिकाणी शहाळे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

दिवसेंदिवस तापमान वाढत असल्याने तहान भागविण्यासाठी सर्वसामान्यांच्या आवडीचे पेय असल्याने शहाळ्याला मागणी अधिक असते. याने पोट भरते आणि शहाळ्याच्या दरांत लक्षणीय वाढ झाली आहे.

गेल्या वर्षी हेच शहाळे ४० ते ३० रुपयांना मिळते. आता प्रत्येक शहाळ्यामागे दहा रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे ज्यांच्या खिशाला परवडते तेच ग्राहक यंदा शहाळे खरेदी करीत असल्याचे विक्रेत्याने सांगितले.

शहाळे हे केरळ आणि मद्रास येथून येतात. एका ट्रकमधून सात ते आठ हजार शहाळे येतात. पेट्रोल व डिझेलच्या दारात वाढ होण्याआधी २५ हजार वाहतुकीचा खर्च होता आता ४० हजारांवर गेला आहे. त्यामुळे ही दर वाढ झाली आहे तसेच उन्हामुळे शहाळ्याना मागणीदेखील असते. अलिबाग, उरण तालुक्यातील केगाव, नागाव येथूनही उपलब्ध आहेत.

> ***असे आहेत विविध फायदे***
>
> ***रोज शहाळ्याचे पाणी प्यायल्याने दिवसभर शरीरात ऊर्जा राहते. रोगप्रतिकारक क्षमता वाढते, वजन कमी करण्यास मदत होते. प्रोटीन आणि कॅल्शियम यामध्ये भरपूर असते. दिवसभर भूक लागत नाही, त्वचा निरोगी राहते, डिहायड्रेशनपासून वाचण्यास मदत होते, असेही विक्रेता नसीर खान यांनी सांगितले.***

## रसायनीत सर्वधर्मियांची सामंजस्याची भूमिका

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गेले काही दिवस मशिदींवरील भोंगे आणि हनुमान चालीसा पठण या मुद्यांवर वातावरण तापले होते. रसायनी पोलीस स्टेशन हद्दीतील मशिदींमध्ये बुधवारी (दि. ४) पहाटेची बांग दिली गेली मात्र त्यासाठी लाऊडस्पीकरचा वापर केला गेला नसून सुप्रीम कोर्टाच्या नियमांचे अनुपालन करण्याचा संकल्प यानिमित्ताने केला गेल्याचे चित्र दिसून आले.



रसायनी पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत येणाऱ्या परिसरातील सर्वच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील घटकांनी यानिमित्ताने एकत्र येऊन सार्वजनिक सुरक्षेला बाधा येणार नाही आणि कायदे भंग होणार नाही याचे भान ठेवल्याचे चित्र दिसल्याने वातावरणातील ताण ओसरण्यास सुरुवात झाली आहे. यातच रसायनी पोलिसांनी वावेघर व आपटा मशिदीबाहेर डोळ्यात तेल घालून पहारा ठेवल्याचे दिसून आले.

अक्षय्य तृतीया आणि रमजान ईदच्या निमित्ताने दिसून आलेला भाईचारा असाच यापुढेही राहिल याचे स्पष्ट संकेत दिसून आले आहेत. या दरम्यान कोणीही अवास्तव आक्रमकपणा न दाखविता सामाजिक एकोपा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता सामंजस्याची भूमिका स्वीकारली या भूमिकेचे स्वागत करीत असल्याच्या प्रतिक्रिया आता सर्वसामान्य नागरिकांतून प्रतिबिंबित होत आहेत.

रसायनी परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वपोनि. कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा तैनात करण्यात आली होती.

# उमटे धरणाबाबत केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांना साकडे



**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील उमटे धरणात साचलेला गाळ काढून या धरणाची पाणी साठवणूक क्षमता वाढवावी, अशी मागणी भाजप ओबीसी सेल अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे यांनी बुधवारी (दि. ४) केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडे केली.

केंद्रीय मंत्री कपिल पाटील बुधवारी अलिबाग तालुक्यात आले होते. त्या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्यासह ओबीसी सेल अध्यक्ष अध्यक्ष अशोक वारगे यांनी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची भेट घेतली व त्यांना उमटे धरणाबाबत माहिती दिली आणि निवेदन दिले.

उमटे धरणातून १९ गावांना पाणी पुरवठा होतो. परंतु हे धरण आता गाळाने भरले आहे. त्यामुळे त्याची खोली कमी झाली आहे. धरणात पाणी कमी असल्यामुळे पाणीपुरवठा नियमित होत नाही. या धरणातील गाळ काढणे आवश्यक आहे, असे या निवेदनात म्हटले आहे.

भाजप अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष जयदीश घरत, जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर, समीर राणे, रामराज पंचायत समिती विभाग भाजप अध्यक्ष अजिक्य पाटील, मसंकुळे सरपंच सुजित गावंड, कुर्डूस सरपंच अनंत पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



(छाया : संजय खांबेटे)

# नदीपात्रात बांधकाम, खारफुटीची कत्तल

## अतिक्रमण हटविण्यासाठी खारगाव बुद्रुक ग्रामस्थांचे म्हसळा तहसीलदारांना निवेदन

**म्हसळा : प्रतिनिधी**

शहराला लागूनच असलेल्या जानसई नदी पात्रात खारफुटी (मँग्रोज)ची कत्तल करून शासनाची कोणतीही परवानगी न घेता सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून कोळंबी प्रकल्प तयार करण्यासाठी आरसीसी पद्धतीचे पक्के बांधकाम करण्यात येत आहे. हे अतिक्रमण त्वरीत हटवावे, अशी मागणी खारगाव बुद्रुक ग्रामस्थांनी म्हसळा तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जानसई नदी पात्रात पक्के बांधकाम करून खारे पाणी आडवले गेल्यास खारगाव बुद्रुक येथील दोन विहिरीत खारे पाणी शिरून गावात पाणीटंचाई निर्माण होणार आहे. नदी पात्रात पक्के बांधकाम झाल्यास परिसरातील गावांना पुराचा धोका होण्याचा संभव आहे. पुराचे पाणी जाऊन शेती नष्ट होण्याची भीती आहे, असे खारगाव बुद्रुक ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

नदीचे पात्रात पक्के बांधकाम करणे किंवा नदीच्या मुळ प्रवाहात बदल करण्यास कायदेशीर मनाई असताना तसेच संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केल्याने त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सरपंच अनंत नाक्ती यांनी सुरुवातीलाच केली होती. त्यानंतर सदरचे अनधिकृत बांधकाम हटविण्यात यावे, यासाठी खारगाव बुद्रुकचे सरपंच अनंत नाक्ती, कोळी समाज अध्यक्ष द्वारकानाथ पाटील, सेनेचे उपविभाग प्रमुख हेमंत नाक्ती, गणेश नाक्ती, बाळकृष्ण पांडव, दत्तात्रय कांबळे यांनी म्हसळा तहसीलदार कार्यालयात १३जानेवारीला तक्रार अर्ज दाखल केला होता. मात्र त्यावर काहीच कारवाई झाली नसल्याने ग्रामस्थांनी पुन्हा तहसीलदार समीर घारे यांच्याकडे तक्रार अर्ज दिला आहे.

जानसई नदी पात्रात केलेल्या अनधिकृत बांधकामाची योग्य दखल न घेतल्यास ग्रामस्थ उग्र आंदोलन करतील, असा इशाराही पुन्हा दिलेल्या तक्रार अर्जात देण्यात आला आहे.

> **खारफुटी (मँग्रोज)ची कत्तल करून जानसई नदी पात्रात दिवसाढवळ्या कोळंबी प्रकल्पासाठी पक्के बांधकाम होत आहे. त्याबाबत महसुल विभागाकडे दिलेल्या अर्जावर चार महिने कारवाई होत नाही तसेच खारफुटीच्या कत्तलीकडे शासन दुर्लक्ष करते, हे खेदाचे आहे.**
>
> **–अनंत नाक्ती, सरपंच, खारगाव बुद्रुक, ता. म्हसळा**

# मनसेतर्फे पालीतील मारुती मंदिरात पोलीस बंदोबस्तामध्ये आरती, हनुमान चालिसा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका मनसेतर्फे बुधवारी (दि. ४) पालीतील मारुती मंदिरामध्ये आरती करण्यात आली तसेच छोट्या स्पीकरवर हनुमान चालिसादेखील लावण्यात आली होती. या वेळी मंदिराभोवती व पाली शहरात पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच तालुक्यातील मनसेच्या १० पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सीआरपीसी कलम १४९ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली होती.

पालीतील मारुती मंदिरामध्ये आरती करण्यासाठी मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे, तालुका सचिव सचिन झुंजारराव, मनसे विद्यार्थी सेना सचिव भावेश बेलोसे, जांभूळपाडा विभाग अध्यक्ष शेखर चव्हाण, चव्हाणवाडी शाखा अध्यक्ष परेश वनगले, परळी विभाग माजी अध्यक्ष अल्पेश दळवी, विठ्ठल मनवे, दिनेश मोरे व विजय चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.



(छाया : धम्मशील सावंत)

## दुचाकी घसरून एक जण जखमी

**पेण :** मुंबई-गोवा महामार्गावर डोलवी गावाच्या हद्दीत दुचाकी घसरून चालक जखमी झाला. नरेंद्र विजय देशमुख (वय २६, रा. ओवळी आमटेम, ता. पेण) हे दुचाकी (एमएच-०६,सीइ-५०११) चालवत पेण बाजुकडून गोवा बाजूकडे जात होते. या अपघाताची नोंद वडखळ पोलीस ठाण्यात झाली आहे.

# बिरवाडीतील अतिवृष्टीबाधिताचा नुकसानभरपाईसाठी उपोषणाचा इशारा

**महाड : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे महाड तालुक्यासह बिरवाडीमधील अनेक दुकानांचे नुकसान झाले होते. त्याचे रीतसर पंचनामे करण्यात आले होते आणि त्यानुसार शासनाकडून दुकानदारांना नुकसान भरपाई देण्यात आली होती. मात्र बिरवाडी येथील आपले सरकार सेवा केंद्राचे मालक मयुर कांबळे यांना अद्याप शासनाचा मदत निधी मिळालेला नाही. त्याबाबत वारंवार पाठपुरावा करूनदेखील प्रशासनाकडून हालचाली होत नसल्याने मयुर कांबळे यांनी गुरुवार (दि. ५) पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

बिरवाडी येथील नक्षत्र कॉम्प्लेक्समध्ये मयुर कांबळे यांचे एम. के. इन्फोटेक या नावाने आपले सरकार सेवा केंद्र असून या केंद्राच्या माध्यमातून ते बिरवाडीसह आजूबाजुच्या खेडोपाड्यांमधील नागरिकांना आधार कार्ड, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याचे काम करतात. २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बिरवाडी गावात पुराचे पाणी शिरले होते त्यामध्ये कांबळे यांच्या आपले सरकार सेवा केंद्रामध्येदेखील पाणी गेल्याने तेथील लॅपटॉप, फर्निचर, स्टेशनरीचे नुकसान झाले होते. त्याचा प्रशासनाकडून रीतसर पंचनामा करण्यात आला होता. मात्र शासनाने जाहीर केलेली मदत त्यांना मिळाली नाही. याबाबत मयुर कांबळे यांनी महाड तहसील कार्यालयामधून माहिती घेतली असता, आपले सरकार सेवा केंद्र आस्थापनामध्ये मोडत असल्याने तुम्हाला मदत मिळणार नाही, असे मयुर कांबळे यांनी सांगण्यात आले. मयुर कांबळे यांनी मंत्रालयात जाऊन मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांना एक लेखी पत्र देऊन मदतनिधी मिळावा यासाठी विनंती केली होती. त्याअनुषंगाने मंत्रालयातून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबतचा अहवाल मागितला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महाडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र त्याला सुमारे दोन महिने झाले तरी कोणतीच हालचाल झाली नसल्याने नाईलाजास्तव आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला असल्याचे मयुर कांबळे यांनी सांगितले.

# पोलादपूर तालुक्यात पाणीटंचाई

## टँकरने पुरवठा करण्यास निविदाधारकाचा नकार


**पोलादपूर : प्रतिनिधी**

पाणीटंचाई निवारण आराखड्यातील पोलादपूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांची टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी १ एप्रिल २०२२ पासून सुरू झाली आहे. मात्र प्रतिकिलोमीटर भाडे परवडत नसल्याने परजिल्ह्यातील टँकर निविदाधारकाने पोलादपूर तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे तालुक्यातील पाणीटंचाईने उग्र स्वरूप धारण केले आहे.

पोलादपूर तालुक्याच्या टंचाई निवारण आराखड्यामध्ये सुमारे एक कोटी ७९ लाख ९५ हजार रूपये खर्चाच्या एकूण ३२८ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यात २८ गावे आणि ६१ वाड्यांतील विहिरींतील गाळ उपसा करून खोल करण्याचे ६१ लाख २० हजार रुपयांचे ८९ प्रस्ताव आहेत. ४५ गावे १०६ वाड्यांसाठी ३० लाख २० हजारांचे टँकर अथवा बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव आहेत. तसेच सात गावे आणि दोन वाड्यांतील नऊ नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरूस्ती करण्याकामी ४५ लाखांचे प्रस्ताव करण्यात आले आहेत. विंधन विहिरींच्या दुरूस्तीचे दोन गावे नऊ वाड्यांमध्ये दोन लाख ७५ हजार रुपये खर्चाच्या११ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. १३ गावे आणि ५५ वाड्यांमध्ये ६८ विंधन विहिरी घेण्यासाठी ४० लाख ८० हजारांचा प्रस्ताव करण्यात आला आहे. यापैकी काही टंचाईनिवारणाची कामे आधीच सुरू झाली आहेत.

निविदाधारक विजय विलास शिंदे (रा.नाणार गल्ली, कवठेमहांकाळ, जि. सांगली) यांनी पोलादपूर तालुक्यातील ४५ गावे १०६ वाड्यांसाठी टँकर अथवा बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करण्याचे काम स्वीकारले आहे. मात्र पोलादपूर तालुक्यातील रस्ते आणि भौगोलिक परिस्थिती पाहता प्रति किमी भाडे कमी मिळत असल्याचे कारण दाखवून त्याने पाणीपुरवठा करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे तालुक्यातील पाणीटंचाईच्या झाळा अधिक तीव्र झाल्या आहेत.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊन टँकरद्वारे पाणीपुरवठा करणारा नवीन निविदाधारक तातडीने अधिग्रहीत केला करावा, अशी मागणी होऊ लागली आहे.



(छाया : शैलेश पालकर)

# इंडियन आयडल उपविजेत्या श्वेता दांडेकरचा मुरूडमध्ये सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद मुरुड शाखा आणि कलासागर नाट्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी इंडियन आयडल स्पर्धेत उपविजेतेपद पटकवणाऱ्या श्वेता दांडेकरचा मुरूड लक्ष्मीखार येथील मनीष माळी यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

मुरूडमधील अनेक कलाकार आघाडीवर आहेत याचा सार्थ अभिमान आहे, असे कोमसाप शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी या वेळी सांगितले. सिद्धेश लखमदे यांनी श्वेतावर लिहिलेली शुभेच्छापर कविता सादर केली. कोमसाप मुरूड शाखेचे कार्याध्यक्ष अरुण बागडे, आशिष पाटील, सायली गुंजाळ, उमा बागडे उपस्थित होते.



# कर्जतमध्ये पहाटेची अजान भोंग्याविना

**कर्जत : बातमीदार**

मशिदीवरील भोंग्यांचा आवाज कमी झाल्याने मनसेच्या कार्यकर्त्यांनी कर्जतमध्ये आंदोलन केले नाही. दरम्यान, कर्जत आणि नेरळमध्ये शांतता असून पोलीस सतर्क असल्याचे दिसून येत आहेत.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार मशिदीवरील अजान भोंगे न लावता व्हावी, अन्यथा मनसेचे कार्यकर्ते मशिदीसमोर भोंगे लावून हनुमान चालिसा पठण करतील असा इशारा राज ठाकरे यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर कर्जत पोलिसांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले होते. त्यासाठी मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, शहर अध्यक्ष संतोष चव्हाण यांच्यासह २० कार्यकर्त्यांना नोटिसा बजावल्या आहेत. तर नेरळ पोलीस ठाण्याने मनसेच्या १५हून अधिक कार्यकर्त्यांना १४९च्या नोटीस बजावल्या आहेत तसेच मशीद ट्रस्टच्या मौलाना यांना नोटीस बजावून भोंग्यांचा आवाज ५५ डेसिबलपेक्षा अधिक राहणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले होते.

कर्जत तालुक्यात बुधवारी (दि. ४) पहाटेची अजान भोंग्याविना झाली, तर नंतरच्या अजान या ५५ डेसिबल एवढ्या आवाजात झाल्या. नेरळमध्ये गेले चार दिवस सकाळची अजान भोंग्याविना होत असून आवाजाचे निर्बंध पळाले जात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. त्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही मशिदीसमोर आंदोलन केले नाही.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

**RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE (SELF FINANCE)**

Plot No. - 1, Sector-33, KHARGHAR - NAVI MUMBAI - 410210

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTSFOR THE ACADEMIC YEAR 2022-2023. (FOR SELF-FINANCE PROGRAMMES)**

**Full Time Assistant Professors for the Academic Year 2022-2023, On Purely Temporary and Ad-hoc Basis for the following subjects.**

| Sr. No. | Subjects | Specialization |
|---|---|---|
| 1 | English | English |
| 2 | Chemistry | Analytical / Inorganic Organic |
| 3 | Physics | Physics |
| 4 | Botany | Botany |
| 5 | Information Technology | Information Technology / Computer Science / MCA |
| 6 | Mathematics | Mathematics /Statistics |
| 7 | Commerce | Commerce |
| 8 | Commerce | Accountancy |
| 9 | Business Economics | Economics |
| 10 | Accounting and Finance | Economics and Commerce / Research Methodology and Business Communication |
| 11 | Management Studies | Finance / Human Resource/ Marketing |

- Qualification as per the University Norms
- Applications with full details should reach to the **CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA, RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE**, Plot No. - 1, Sector-33, KHARGHAR - NAVI MUMBAI - 410210.
- **Last date for application- Saturday, 21st May, 2022**
- Candidatesshould submit the application in person/by post.
- If required Contact: - Mr. Nitin Vaskar - **9821967877**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**

**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

**CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS)**

Plot No.01, Sector 11, Khanda Colony, New Panvel (W), Navi Mumbai-410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2022-2023 (FOR SELF-FINANCE PROGRAMMES)**

**Full Time Assistant Professors for the Academic Year 2022-2023, On Purely Temporary and Ad-hoc Basis for the following subjects.**

| Sr. No. | Subjects | Specialization |
|---|---|---|
| 1 | English | English |
| 2 | Chemistry | Analytical / Inorganic / Organic / Physical |
| 3 | Information Technology | Information Technology / MCA / Computer Science |
| 4 | Computer Science | MCA / Computer Science |
| 5 | Biotechnology | Microbiology/ Biotechnology |
| 6 | Commerce | Commerce |
| 7 | Commerce | Accountancy |
| 8 | Accounting and Finance | Economics and Commerce / Research Methodology and Business Communication |
| 9 | Mathematics | Mathematics |
| 10 | Management Studies | Finance / Human Resource / Marketing |
| 11 | Placement Officer | — |

- Qualification as per the University Norms
- Applications with full details should reach to the **CHAIRMAN, J.B.S.P. SANSTHA, CHANGU KANA THAKUR, ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS),** Plot No. 1, Sector-11, Khanda Colony, New Panvel. (W) 410206.
- **Last date for application- Saturday, 21st May, 2022**
- Candidatesshould submit the application in person/by post.
- If required Contact: - Mr. Pralhad Thakur - **9022600288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**

**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | दिल्ली वि. हैदराबाद सायं. ७.३० वा., मुंबई

# पंजाबची गुजरातवर मात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मंगळवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सला आठ गडी आणि चार षटके राखत मात दिली. गुजरातने पंजाबसमोर विजयासाठी १४४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. शिखर धवन, भानुका राजपक्षे, लियाम लिव्हिंगस्टोन या तीन फलंदाजांनी पंजाबला विजयापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले. गुजरातचा या हंगामातील हा दुसरा पराभव आहे.



गुजरातने विजयासाठी दिलेल्या १४४ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी पंजाबकडून जॉनी बेअरस्टो आणि शिखर धवन ही जोडी सलामीला आली. जॉनी बेअरस्टो मैदानावर तग धरू शकला नाही. तो अवघी एक धाव करुन झेलबाद झाला. त्यानंतर मात्र शिखर धवन, भानुका राजपक्षे आणि लियाम लिव्हिंगस्टोन या त्रिकुटाने पंजाबला विजय मिळवून दिला. शिखर धवनने ६२ धावांची नाबाद खेळी केली. भानुकाने २८ चेंडूमध्ये ४० धावा करीत पंजाबसाठी विजय सोपा केला. मग लियाम लिव्हिंगस्टोनने धवनला साथ धेत अवघ्या दहा चेंडूंमध्ये ३० धावा केल्या.

याआधी नाणेफेक जिंकून गुजरातने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र गुजरातचा हा निर्णय चुकीचा ठरला. गुजरातचे सलामीला आलेले दोन्ही फलंदाज खास कामगिरी करू शकले नाहीत. वृद्धीमान साहा २१ धावांवर असताना कासिगो रबाडाच्या चेंडूवर झेलबाद झाला, तर शुभमन गिल अवघ्या नऊ धावांवर धावबाद झाला. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या साई सुदर्शनने मात्र धडाकेबाज फलंदाजी करीत अर्धशतक झळकावले. त्याने ५० चेंडूमध्ये पाच चौकार आणि एक षटकार लगावत नाबाद ६५ धावांची खेळी केली. सुदर्शनच्या खेळीमुळेच गुजरातला १४३ धावांपर्यंत पोहचता आले.

साई सुदर्शन वगळता गुजरातचा एकही फलंदाज चांगली फलंदाजी करु शखला नाही. हार्दिक पांड्याने निराशा केली. अवघी एक धाव करून तो बाद झाला तसेच डेविड मिलरदेखील ११ धावा करू शकला. गुजरातचा फिनिशर म्हणून ओळख असलेला राहुल तेवतियादेखील आपली जादू दाखवू शकला नाही. त्याला फक्त ११ धावा करता आल्या. राशिद खान (०) आणि शेवटच्या फळीतील प्रदीप संगवान (२), लॉकी फर्ग्युसन (५), अलझारी जोसेफ (४ नाबाद) खास कमाल दाखवू शकले नाहीत.

## रायगडात रंगणार महिला क्रिकेट प्रीमियर लीग

**कर्जत : बातमीदार**

आयपीएल या नोंदणीकृत संस्थेकडून रायगड जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटूंना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी १५ ते २५ मे या कालावधीत महिला प्रीमियर लीग खेळविली जाणार आहे. या स्पर्धेची घोषणा आयोजकांनी केली असून यासाठी निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील क्रिकेट सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. वेगवेगळ्या ठिकाणी विविध स्तरावरील खेळाडूंसाठी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. मागील तीन महिन्यांत काही आयोजकांनी कुमार गटातील स्पर्धेत जिल्ह्यातील महिला खेळाडूंनादेखील संधी दिली. महिला खेळाडूंनी मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा उठवत आपली छाप स्पर्धेवर उमटविली, पण अशा प्रतिभावान क्रिकेटपटूंना एकत्रित खेळण्याची संधी अद्याप जिल्ह्यात मिळत नव्हती. ही खंत दूर करण्यासाठी आरपीएल या नोंदणीकृत संस्थेने पुढाकार घेण्याचे ठरविले असून पहिल्या महिला प्रीमियर लीगची घोषणा करण्यात आली आहे.

रायगड महिला प्रीमियर लीगमध्ये जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटूंची निवड आयोजकांकडून चाचणी पद्धतीने करण्यात येणार आहे. नाव नोंदणीकृत खेळाडूंचे वेगवेगळे तुल्यबळ संघ बनविण्यात येतील. निवड प्रक्रिया १० मे रोजी रोहा येथे घेण्यात येणार आहे. निवडण्यात आलेल्या महिला संघांसाठी सरावाची व्यवस्था आयोजकांकडून केली जाणार आहे.

स्पर्धेतील सामने लीग पद्धतीने खेळविण्यात येतील. प्रत्येक सामना २५ षटकांचा असेल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महिला खेळाडूंनी आपली माहिती आरपीएल प्रतिनिधी संदीप जोशी (७४९९७७२४५३) यांच्याकडे उपलब्ध आहे.


|| श्री हरेश्वर प्रसन्न || || श्री सिध्दिविनायक प्रसन्न || || श्री पंचमुखी हनुमान प्रसन्न ||

**|| सुखम् हॉस्पिटल ||**

तुम्ही घडविलेला, तुमच्या साथीने घडलेला ''दशकपूर्ती सोहळा''.
डॉ. संतोष सुदाम जाधव लिखित ''झुंज सुखम् ची कोरोनाशी'' या अनुभवांच्या गाथेचे प्रकाशन तसेच ''सुखम् पोर्टल' आणि "BMD App" शुभारंभ
शुक्रवार, दि.६ मे २०२२ रोजी सायं. ४.०० ते ८.०० वा.
सुखम् हॉस्पिटल ११ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.
हा अविस्मरणीय क्षण साजरा करीत आहोत. त्यानिमित्त आयोजिलेल्या स्नेहमेळाव्यास अवश्य उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.

**प्रमुख अतिथी**

मा. श्री. प्रशांत ठाकूर साहेब (आमदार पनवेल विधानसभा, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष)
मा. श्री. पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर साहेब (एम. डी. मेडिसिन)
मा. श्री. डॉ. संजय ओक साहेब (बालशल्य चिकित्सक, अध्यक्ष, कोविड टास्क फोर्स महाराष्ट्र)

**कार्यक्रम स्वरुप**

* वीरेंद्र केंजळे प्रस्तुत ''साज'' ऑर्केस्ट्रा (मराठी हिंदी जुन्या गीतांची सुरेल मैफल) - सायं. ४ ते ६ वा.
* ''झुंज सुखम् ची कोरोनाशी'' या अनुभवांच्या गाथेचे प्रकाशन
* कोविड योद्ध्यांचा गुणगौरव सोहळा
* स्नेह भोजन रात्री ८.०० ते आपल्या आगमना पर्यंत

**निमंत्रक**

**समस्त सुखम् आणि जाधव परिवार**

स्थळ : वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल. मो. : ९००४६५७९८८/९९८७७२९९८८




## माथेरानमध्ये ५० प्लस क्रिकेट स्पर्धा
## डोंबिवली संघ विजेता

**कर्जत : बातमीदार**

एक धाव आरोग्यासाठी या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यातील ४० प्लस असोसिएशनच्या माध्यमातून जिल्ह्यात प्रथमच ५० प्लस वयोगटातील खेळाडूंसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन माथेरानमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धेत डोंबिवली संघाने विजेतेपद पटकाविले, तर उरण संघ उपविजेता ठरला.

माथेरान येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडांगण (ऑलिंपिया ग्राउंड) येथे स्पर्धा रंगली. स्पर्धेत डोंबिवली, उरण, कर्जत, रसायनी, नवी मुंबई येथून संघ आले होते.

## कराटे स्पर्धेत खेळाडूंचे यश




**उरण : बातमीदार**

अलिबाग येथे कराटे डो ऑर्गनायझेशन जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा घेण्यात आली. त्यात गोशीन रियूच्या पनवेल, उरणमधील खेळाडूंनी घवघवीत यश मिळविले.

विविध वजनी गटात आणि काता व कुमिते प्रकारात स्पर्धा झाली. यामध्ये शुभम ठाकूरने दोन सुवर्ण, अमिता घरत सुवर्ण व रौप्य, नेहा पाटील, विनया पाटील, श्लोक ठाकूर, सेजल पाटील, अमर घरत सुवर्ण व कांस्य, अभिज्ञा पाटील, नेत्रा गावंड, कक्षा म्हात्रे, समिक्षा पाटील, मानसी ठाकूर, रोहित घरत, अनिश पाटील, वैदेही घरत, सुजित पाटील यांनी सुवर्ण, तमन्ना गावंड दोन रौप्य, परेश पावस्कर, अर्णव पाटील, योग म्हात्रे, अमिषा घरत, करण पाटील, पूर्वा पाटील रौप्य व कांस्य, अंश म्हात्रे, स्पर्श ठाकूर यांनी रौप्य आणि रितिका जोगदंडने दोन कांस्यपदके जिंकली.

पदकविजेत्या मुलांची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे. या मुलांना गोपाळ म्हात्रे, राकेश म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

## आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलचा अंतिम सामना २९ मे रोजी अहमदाबादला होणार आहे. याचप्रमाणे महिलांची ट्वेन्टी-२० चॅलेंज ही प्रायोगिक तत्त्वावरील स्पर्धा २३ ते २८ मे या कालावधीत पुण्यात होणार आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) घोषित केले आहे.

आयपीएलचे क्वालिफायर-१ आणि एलिमिनेटर हे दोन सामने अनुक्रमे २४ आणि २५ मे या दिवशी कोलकाताच्या ईडन गार्डन्स स्टेडिमयवर होणार आहेत. त्यानंतर क्वालिफायर-२ व अंतिम सामना अनुक्रमे २७ आणि २९ मे या दिवशी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होतील.

**महिलांची ट्वेन्टी-२० चॅलेंज स्पर्धा पुण्यात**


गेल्या महिन्यात झालेल्या बीसीसीआयच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीनंतर अध्यक्ष सौरव गांगुलीने महिलांची ट्वेन्टी-२० चॅलेंज स्पर्धा लखनऊला होणार असल्याचे म्हटले होते, पण या स्पर्धेचे सामने आता पुण्यात २३, २४ व २६ मे या दिवशी होतील, तर अंतिम सामना २८ मे रोजी खेळवण्यात येणार आहे.







## एकेकाळी झाडू मारणारा रिंकू कोलकाताच्या विजयाचा हिरो



**लखनऊ : वृत्तसंस्था**

यंदाचा आयपीएल हंगाम अनेक युवा खेळाडूंसाठी चांगला ठरला आहे. अभिषेक शर्मा, उमरान मलिक, तिलक वर्मा, कुलदीप यादव, मोहसीन खान, मुकेश चौधरी या खेळाडूंनी आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या यादीत रिंकू सिंगचे नावही जोडले गेले आहे.

कोलकाता नाईट रायडर्सला राजस्थान रॉयल्सविरुद्ध २३ चेंडूंत ४२ धावांच्या नाबाद खेळीत सात गडी राखून विजय मिळवून देण्यात रिंकूने महत्त्वाची भूमिका बजावली. यापूर्वी क्षेत्ररक्षणातही त्याने दोन झेल घेतले होते. त्याला सामनावीर पुरस्कार मिळाला.

१२ ऑक्टोबर १९९७ रोजी उत्तर प्रदेशातील अलिगढ येथे जन्मलेल्या रिंकू सिंगची क्रिकेटकारकीर्द चढ-उतारांनी भरलेली आहे. त्याचे वडील गॅस सिलिंडर पोहचवण्याचे काम करायचे. रिंकू नववीत नापास झाला होता आणि जास्त शिक्षण नसल्याने त्याला चांगली नोकरी मिळत नव्हती. अखेर त्याला भाऊ जिथे घेऊन गेला तिथे झाडू मारण्याचे काम मिळाले. त्यानंतर त्याने क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आणि तो यशस्वी झाला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com